




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २३२ ■ रविवार, दि. १ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com



होली की पिचकारी
होली कलर, पिचकारी, गुलाल, फायरोपॉक, फॉक, एअर बलून गन, बलुन, फॅन्सी मास्क, टैग में वैराइटी गुलालगंज इलेक्ट्रॉनिक गण, इलेक्ट्रॉनिक टॅग, गुलाल, गुलाल सिलेंडर, हेअर मास्क/ब्लॅक हेअर ,मलींगा कॅप, टी शर्ट, टॅक मे व्हेरायटी, क्रिकेटर
होलसेल भाव में चिल्लर उपलब्ध.
दीपक ट्रेडिंग कंपनी
शॉप नं. ६८, जी.एम.डी. मार्केट, राम नगर, अकोला.


# अमेरिका, इस्त्रायलच्या हल्ल्यात अयातुल्ला खामेनींचा मृत्यू

वृत्तसंस्था १ मार्च

**तेहरान :** अमेरिका आणि इस्त्रायलचे इराणवरील हल्ले अद्याप सुरू असून, इराणही प्रत्येक हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर देत आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतन्याहू यांनी दावा केला आहे की, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. इराणी माध्यमांनीदेखील खामेनी यांच्या मृत्यूची पुष्टी केल्याचे वृत्त आहे. आता खामेनी नेमके कसे मारले गेले? याबाबत माहिती समोर आली आहे.

मीडिया अहवालांनुसार, खामेनी हे सुरक्षा परिषदेचे सल्लागार अली शमखानी आणि इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सचे प्रमुख मोहम्मद पाकपूर यांच्यासोबत बैठक घेत असताना इस्त्रायलने त्या ठिकाणी स्ट्राइक केला. हा हल्ला काल करण्यात आल्याचे सांगितले जाते. रिपोर्ट्सनुसार, इस्त्रायल आणि अमेरिका अली शमखानी यांचा सातत्याने मागोवा घेत होते. शनिवारी ते खामेनी यांना भेटण्यासाठी गेले असताना, दोन्ही देशांनी संयुक्तरीत्या खामेनी यांच्यावर हल्ला केल्याचा दावा करण्यात आला आहे. या हल्ल्यात



८६ वर्षीय इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

दरम्यान, खामेनी यांच्या सोबत कुटुंबातील आणखी चार सदस्यांचाही मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. इराणी माध्यमांनीही या बातमीची पुष्टी केल्याचे सांगितले जाते. 'प्रेस टीव्ही'ने खामेनी आता हयात नसल्याचे वृत्त दिले आहे. त्यांच्या निधनानंतर ४० दिवसांच्या राष्ट्रीय शोकाची घोषणाही करण्यात आली आहे. मध्यपूर्वेत तणावाची परिस्थिती कायम आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणने अनेक अमेरिकन लष्करी तळांना लक्ष्य केले आहे. दरम्यान, रविवारी (१ मार्च २०२६) खामेनी यांच्यासह त्यांच्या मुलगी, जावई आणि नात यांचाही मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आले आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत दावा केला की, ८६ वर्षीय आयतुल्लाह अली खामेनी यांचा एका लष्करी मोहिमेदरम्यान मृत्यू झाला आहे. ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये खामेनी यांना इतिहासातील सर्वात वाईट व्यक्तींमधील एक असे संबोधले आणि त्यांच्या मृत्यूला न्याय मिळाल्याचे म्हटले. यासोबतच ट्रम्प यांनी असेही नमूद केले की, मध्यपूर्वेत आणि जगात शांतता प्रस्थापित होईपर्यंत किंवा संपूर्ण आठवडा अखंडपणे बॉम्बहल्ले सुरू राहतील. ट्रम्प यांच्या या वक्तव्यानंतर आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये बातम्या वेगाने पसरल्या असून परिस्थितीबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

**जागतिक विमान वाहतूक विस्कळीत**

इराण आणि इस्त्रायलमधील युद्ध शिगेला पोहोचल्याने जागतिक विमान वाहतूक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. युरोप, मध्य पूर्व आणि आशियातील अनेक विमान कंपन्यांनी सुरक्षिततेच्या कारणास्तव आपली उड्डाणे रद्द केली आहेत किंवा त्यांचे मार्ग बदलले आहेत. हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे विमान कंपन्यांनी अत्यंत सावधगिरीचा पवित्रा घेतला आहे.इराणी हवाई क्षेत्र बंद झाल्याचा सर्वाधिक फटका भारत-युरोप हवाई



मार्गांना बसला आहे. विशेषतः दिल्ली, मुंबई आणि बेंगळुरू येथून ब्रिटन आणि युरोपला जाणारी विमाने सहसा इराणवरून प्रवास करतात, जी आता विस्कळीत झाली आहेत. विमानांना आता मध्य आशिया किंवा अरबी समुद्रावरून लांबचा वळसा घालून जावे लागत आहे. यामुळे प्रवासाचा वेळ आणि इंधन खर्च दोन्हीमध्ये मोठी वाढ झाली आहे. 'ॲरोस्पेस ग्लोबल न्यूज'च्या अहवालानुसार, मार्ग बदलल्यामुळे प्रति तास सुमारे अंदाजे ५ लाख रुपये जादा खर्च येत आहे. हा अतिरिक्त भार लवकरच 'सरचार्ज' किंवा तिकीट दरवाढीच्या स्वरूपात प्रवाशांवर पडण्याची शक्यता आहे. मध्य पूर्वेतील सर्व उड्डाणे तात्पुरती स्थगित केली आहेत. हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे दिल्ली-तेल अवीव विमान सेवा मुंबईकडे वळवण्यात आली आहे. इराणच्या हवाई मार्गाचा वापर करणारी अलमाटी, बाकू, ताश्कंद आणि तिबिलिसी येथील उड्डाणे २८ मार्चपर्यंत स्थगित करण्यात आली आहेत.

# शहरात पुरवठा विभागाची एकाच वेळी अनेक ठिकाणी धडक कारवाई!





प्रतिनिधी १ मार्च

**अकोला :** अकोला जिल्ह्यासह शहरात मोठ्या प्रमाणात घरगुती गॅस सिलिंडरचा वापर व्यावसायिक कारणांसाठी होत असल्याचे वृत्त आरआरसी न्यूजने प्रसारित केले होते. याची जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेत शनिवार, २८ फेब्रुवारीला एकाच वेळी शहरातील विविध भागात घरगुती गॅस सिलिंडर वापर करणाऱ्या व्यावसायिकांच्या दुकानांवर धाड टाकली. या धडक कारवाईत २५० सिलिंडरसह ५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विशेष म्हणजे ही कारवाई करण्यासाठी पाच भरारी पथकांचे गठन करून एकाच वेळी धाड टाकल्यामुळे व्यावसायिकांना धांदल करण्यासाठी वेळच मिळाला नाही. या कारवाईमुळे व्यावसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली असून, ही कारवाई पुढेही सुरूच राहणार असल्याचे पुरवठा विभागाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

अकोला जिल्ह्यात व्यावसायिक ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होत असल्याबाबतची वृत्त आरआरसी न्यूजने प्रसारित केले होते. याची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ घरगुती गॅस सिलिंडर वापरणाऱ्यांवर कारवाईची आदेश पारित केले होते. त्याच अनुषंगाने शनिवारी अकोला शहरात जिल्हा पुरवठा विभागाच्यावतीने एक धडाकेबाज कारवाई करीत शहरातील विविध हॉटेल, चहा टपरी व इतर ठिकाणांवरून घरगुती वापरामध्ये येणारे विविध कंपनीचे २५० सिलिंडर जप्त करण्यात आले.

## शहरातील विविध ठिकाणी धाडसत्र

अकोला जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, बस स्थानक, रेल्वे स्टेशन परिसर, खडकी, उमरी, जुने शहर, डाबकी रोड, वाशिम बायपास, हरिहर पेठ, बाजारपेठचा एरिया, सिंधी कॅम्प व इतर ठिकाणी धाड टाकून पुरवठा विभागांनी २५० च्या वर घरगुती गॅस वापराचे सिलिंडर जप्त केले आहेत. या संपूर्ण कारवाईत पाच लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती पुरवठा विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

## शहरात घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजारावर शिक्कामोर्तब

अकोला शहरात घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार हॉटेल व्यावसायिक सर्रास करीत असल्याचे वृत्त आरआरसी न्यूजने प्रकाशित केले होते. शनिवारी जिल्हाधिकारी व पुरवठा विभागाच्यावतीने करण्यात आलेल्या धडक कारवाईमुळे सापडलेल्या मोठ्या साठ्यामुळे यावर शिक्कामोर्तब झाले आहे. या कारवाईमुळे अवैध गॅस सिलिंडरचा वापर करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

व्यावसायिक कारणांसाठी घरगुती गॅस सिलिंडरचा वापर करणे कायद्याने गुन्हा आहे. असा वापर करणाऱ्या व्यावसायिकांची गय केली जाणार नसून ही कारवाई या पुढेही सुरूच राहणार आहे. त्यामुळे सर्व व्यावसायिकांनी आपल्या दुकानांमध्ये व्यावसायिक सिलिंडरचाच वापर करावा.

**रविंद्र यन्नावार,**
जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला

# दोन मुलांचा दगड खाणीत बुडून मृत्यू

प्रतिनिधी १ मार्च

**पालघर :** येथील मस्तान नाका परिसरातील बंद दगड खाणीत दोन अल्पवयीन मुलांचा बुडून मृत्यू झालाय. मुंबई–अहमदाबाद महामार्गावरील मस्तान नाका उड्डाणपुलाच्या पश्चिमेकडील टाकवहाल हद्दीत असलेल्या बंद दगड खाणीत ही घटना घडलीय. शुक्रवारी दुपारी दोन अल्पवयीन मुलांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. जिग्नेश विजय पवार (८) आणि आयुष मुकेश पवार (१५) हे तिघा मुलांसोबत खाणीत साचलेल्या पाण्यात आंघोळीसाठी गेले होते. पाण्याची खोली आणि तळाचा अंदाज न आल्याने दोघेही खोल पाण्यात बुडाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच मनोर पोलीस ठाणेचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. तसेच वसई विरार महापालिका अग्निशमन दलाने सखोल शोधमोहीम राबवली.

# काटोलमध्ये स्फोटके बनवणाऱ्या कंपनीत भीषण स्फोट!

## 12 कामगारांचा मृत्यू, 15 जण जखमी

प्रतिनिधी १ मार्च

**नागपूर :** जिल्ह्यातील काटोल तालुक्याच्या राऊळगाव येथे असलेल्या एसबीएल कंपनीत सकाळी ७ वाजताच सुमारास मोठा स्फोट झाला. बारुद आणि त्यापासून डेटोनेटरसह इतर स्फोटके बनवणाऱ्या कंपनीत हा मोठा स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान या भीषण स्फोटात १२ कामगारांचा मृत्यू तर १५ जण जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या भीषण स्फोटानंतर परिसरात मोठा आवाज होऊन एकच खळबळ उडाली.

मोठ्या प्रमाणात झालेल्या स्फोटानंतर परिसरात आगही लागली आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्नीशामक विभगाकडून बचाव कार्य सुरु करण्यात आले आहे. दुसरीकडे मृतकांच्या नातेवाईकांनी परिसरात मोठी गर्दी केल्याचे पाहायला मिळत आहे. नागरिकांमध्ये मोठा रोष उसळल्याचेही चित्र आता बघायला मिळत आहे. एसबीएल कंपनीत सकाळी ७ वाजताच सुमारास हा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र या स्फोटाचे नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. दरम्यान, या स्फोटाच्या अपघातावर काटोलचे आमदार चरणसिंग ठाकूर यांनी १५ मृत्यू आणि २० जखमी झाले असल्याचे सांगितले आहे. या ठिकाणी कंपनीकडून सुरक्षितते बद्दल मोठे दुर्लक्ष असल्याचा आरोप त्यांनी केलाय. प्रशिक्षणाशिवाय आणि कुठलीही आवश्यक ती काळजी न घेता कामगार वापरले जातात, असा त्यांचा आरोप आहे.

# अजित पवारांच्या विमान अपघाताचा 'एएआयबी'चा प्राथमिक अहवाल समोर!

प्रतिनिधी १ मार्च

**मुंबई :** अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामतीमध्ये विमान अपघातात निधन झाले असून आज त्यांच्या विमान अपघाताला एक महिना पूर्ण झाला आहे. अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत रोहित पवारांनी पत्रकार परिषद घेऊन अनेक सवाल उपस्थित करत घातपाताची शंका उपस्थित केली होती. दरम्यान, आता अजित पवार यांच्या विमान अपघाताचा एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो अर्थात एएआयबीचा प्राथमिक चौकशी अहवाल समोर आला आहे. हा अहवाल तब्बल २२ पानांचा असून त्यात अजित पवारांच्या विमान अपघाताची संभाव्य काही कारणे सांगण्यात आली आहेत. या अहवालात फक्त प्राथमिक निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत.

अजित पवार यांचे विमान मुंबईवरून बारामतीत लॅंडिंग करत असताना धावपट्टी ११ वर पहिल्यांदा लॅंडिंगचा प्रयत्न केला गेला. मात्र, पहिल्या प्रयत्नात गो-अराऊंड करण्यात आले. त्यानंतर पायलटने विमान दुसऱ्यांदा लॅंडिंग करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा लॅंडिंग क्लिअरन्सनंतर काही वेळातच हे विमान धावपट्टीच्या डावीकडे सुमारे ५० मीटर अंतरावर झाडांवर आणि भूभागावर आदळले आणि त्यानंतर आगीत ते जळून खाक झाले, असे प्राथमिक अहवालात म्हटले आहे. दरम्यान, फ्लाईट डेटा रेकॉर्डर खराब झाला. मात्र, रॉ डेटा डाऊनलोड करण्यात आला असल्याची माहिती अहवालात देण्यात आली आहे. तसेच सीव्हीआर/एफडीआर च्या सविस्तर विश्लेषणानंतर अपघाताचे कारण समोर येईल, असेही अहवालात म्हटले आहे.

# आजपासून हरभरा हमीभाव खरेदी केंद्र सुरू

प्रतिनिधी १ मार्च

**मुंबई :** राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेत कापूस खरेदीची मुदत १५ मार्चपर्यंत वाढ वण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावळ यांनी शनिवारी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. तसेच निर्णयासोबतच हमीभावाने हरभरा खरेदी प्रक्रिया १ मार्चपासून सुरू होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्यात कापूस खरेदीची मुदत वाढवावी, अशी मागणी सातत्याने शेतकरी संघटनांकडून होत होती. या पार्श्वभूमीवर पणन विभागाने कापूस खरेदीची मुदत वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला होता.


CLASSIFIED

प्लॉट प्लॉट प्लॉट
नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव , हनुमानगडी समोर , छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606 7757905649

सिध्दार्थ वधू-वर सूचक केंद्र
मुला-मुलींचे तसेच घटस्फोटीत यांची नाव नोंदणी करण्यात येईल. याची फी ५०० रुपये राहील. (फक्त बौध्द समाजातील मुला-मुलींकरीता)
-:संपर्क:-
सिध्दार्थ दामोधरे अमरावती
मो.9545000880

फ्लॅट फ्लॅट फ्लॅट
नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट ,गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250 8788432278


# 'एनसीएमसी' कार्डवरून शासनाचा युटर्न!

## एसटी बस सवलत ; ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग प्रवाशांना दिलासा

प्रतिनिधी १ मार्च

**मुंबई :** एसटी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना विविध प्रकारच्या तिकिटांमध्ये सवलती राज्य परिवहन महामंडळाकडून दिल्या जातात. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, महिलांना हाफ तिकीट प्रवास तर दिव्यांग व विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात पास अशा योजना आहेत. मात्र या योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्वांना आता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) बंधनकारक करण्यात आल्याचे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी नुकतेच जाहीर केले होते. त्यानंतर याच्या बातम्याही प्रसिद्ध झाल्या. पण आता



शासनाने यावरुन युटर्न घेतला आहे.

राज्य परिवहन महामंडळाने ट्विटद्वारे माहिती दिली की, 'एनसीएमसी स्मार्ट कार्डची नोंदणी प्रत्येक आगारात सुरु झाली आहे. तथापि, एसटी प्रवासात या स्मार्टकार्डची अद्याप सक्ती करण्यात आलेली नाही. कृपया सर्व प्रवाशांनी याची नोंद घ्यावी.' एसटीचे सहाय्यक जनसंपर्क अधिकारी रोहन देसाई यांनी ही माहिती दिली आहे. दरम्यान, राज्याच्या प्रसिद्धी विभागाने अर्थात माहिती व जनसंपर्क संचालनालयाने हीच माहिती शेअर करताना सवलतीच्या एसटी तिकिटांसाठी एनसीएमसी कार्ड सध्या अनिवार्य नाही. ते अनिवार्य असल्याचा सोशल मीडियावरील दावा खोटा आणि जनतेची दिशाभूल करणारा आहे, असे म्हटले आहे. यावरुन एकीकडे राज्याच्या परिवहन मंत्र्यांनी स्वत:च हे कार्ड अनिवार्य करण्यात आल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले आणि दुसरीकडे याच्या बातम्या या दिशाभूल करणाऱ्या असल्याचे आता राज्याच्या प्रसिद्धी विभागाने म्हटले आहे.

## नागरिकांकडून आल्या होत्या तक्रारी

एनसीएमसी कार्ड अनिवार्य केल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांच्या अनेक तक्रारी येऊ लागल्याने तसेच आधीच आधार कार्डसह विविध प्रकारची कार्ड शासनाने नागरिकांसाठी बंधनकारक केलेली असताना यात आणखी एका कार्डची भर कशासाठी, असा थेट सवालही नागरिक विचारायला लागले आहेत. तसेच हे कार्ड १९९ रुपयांना विकत घेऊन त्यात कमीत कमी १०० रुपये बॅलन्स आणि ते रिचार्जही ५० रुपयांच्या पटीत होणार असल्याने या गोष्टी देखील सर्वसामान्य खेड्यापाड्यातील प्रवाशांसाठी जाचक असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळेच शासनाने आपल्या निर्णयातून युटर्न घेतल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.




सिटी न्यूज अमरावती
रविवार, दि. १ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## उच्च व तंत्रशिक्षण मध्ये पदभरती प्रक्रियेत बदल करण्याच्या सूचनेचा विचार करू - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

**अमरावती:** शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांप्रमाणेच उच्च व तंत्रशिक्षणमध्ये पदभरती प्रक्रिया राबविण्याबाबत शासन नक्कीच सकारात्मक विचार करेल असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

राज्यातील शासन मान्य विद्यापीठ व महाविद्यालयातील पदभरतीसाठी पवित्र पोर्टलप्रमाणे निर्माण करणार का असा विधानसभेत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. या प्रश्नास उत्तर देताना ते बोलत होते. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, शासन मान्य विद्यापीठ व महाविद्यालयातील पदभरतीसाठी भरती प्रक्रिया करताना आठ सदस्यांचे मुलाखत पॅनल असते. या मुलाखत पॅनलमधील सदस्यांनी गुण द्यायचे असतात. यामध्ये संचालकाचा सहभाग ना हरकत देण्यापुरताच असतो. प्रत्येक पॅनलमधील दिलेल्या सदस्याचे गुण एकत्रित करून विद्यापीठाला कळविले जातात. विद्यापीठाने त्याला मान्यता द्यायची असती. मात्र तरीही शिक्षण विभागाप्रमाणे अथवा त्यापेक्षा सुधारित भरती प्रकिया करण्यासाठी सूचना आली आहे.

# स्वच्छता कंत्राटात 'अर्थ' कारणाचा आरोप; अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी

प्रतिनिधी १ मार्च

**अमरावती :** महानगरपालिकेच्या स्वच्छता कंत्राटावरून सर्वसाधारण सभेत जोरदार खडाजंगी झाली. सत्ताधारी व विरोधकांमध्ये तीव्र वाद रंगला. स्वच्छता विभागातील कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत काही नगरसेवकांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी केली.

स्वच्छता अधिकारी यांच्यावर कामात हलगर्जीपणा झाल्याचा आरोप करण्यात आला. ङ्खशहरातील अनेक भागात कचरा वेळेवर उचलला जात नाही. गल्ल्यांमध्ये घाण साचलेली दिसते. नागरिक त्रस्त आहेत,ङ्क असे सदस्यांनी सांगितले. यावर उत्तर देताना प्रशासनाने कंत्राटाच्या अटी व कामकाजाची माहिती सभागृहात मांडली.

दरम्यान, काँग्रेसचे ज्येष्ठ नगरसेवक बबलू शेखावत यांनी प्रशासनावर थेट टीका करत, ङ्खतुम्ही शहर लुटून खाल्ले आहे,ङ्क असा गंभीर आरोप केला. त्यांच्या वक्तव्यामुळे सभागृहात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. महापालिकेतील ज्येष्ठ नगरसेवक विलास इंगोले, व नगरसेवक मिलिंद चिमोटे यांनी सुद्धा प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.

युवासभेमधील सुमती ढोके यांनीही कचरा व्यवस्थापनावर नाराजी व्यक्त केली. 'एक दिवस कचरा तुमच्या दारात येईल, तेव्हा परिस्थितीची जाणीव होईल,' असे त्या म्हणाल्या. नगरसेवक अनिल अपवाळ यांनी स्वच्छतेवर होणाऱ्या खर्चाचा दरमहाचा लेखी अहवाल सभागृहासमोर ठेवण्याची मागणी केली.



प्रदूषणविषयक कायद्यांचे पालन होत आहे का, असा प्रश्न नगरसेविका कल्याणी तायडे यांनी उपस्थित केला. कंत्राटातील अटी-शर्तींची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

सभेत विविध सदस्यांनी आपली मते मांडत शहर स्वच्छतेचा प्रश्न तातडीने सोडविण्याचे आवाहन केले.

नगरसेवक संजय गव्हाणे यांनी शहरातील वाढत्या घुशींचा मुद्दा उपस्थित केला. त्यामुळे लोकांचे आरोग्यावर परिणाम होत आहे. या मुद्द्यावरही त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. प्रशासनानेही त्रुटी दूर करून कामात सुधारणा करण्याचे आश्वासन दिले. मात्र, या विषयावरून पुढील सभेतही चर्चा रंगण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

स्वच्छतेच्या विषयावर बोलावलेल्या विशेष आमसभेत महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, महापालिका आयुक्त सोम्या शर्मा यांच्यासह महापालिकेच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## सराईत गुन्हेगारावर एम पी डी अंतर्गत कारवाई

प्रतिनिधी १ मार्च



**अमरावती :** अमरावती शहरातील सराईत गुन्हेगार अमन कैलास चंडाले वय ३४ वर्ष रा. मनपा शाळा कमांक २ जवळ, मसानगंज, अमरावती यास MPDA कायदयान्वये पोलिसांनी कारवाई केली आहे. अमरावती शहर येथील कुख्यात गुन्हेगार अमन कैलास चंडाले वय ३४ वर्ष रा. मनपा शाळा कमांक २ जवळ, मसानगंज, अमरावती हा सन २०१८ पासुन गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये लिप्त आहे. त्याचे विरुध्द पोलीस स्टेशन नागपुरी गेट आणि गाडगेनगर अमरावती शहर येथे खुनाचा प्रयत्न करणे, महीलांचे विनयभंग करण्याच्या उद्देशाने पाठलाग करणे व बळाचा वापर करने, गृह अतिक्रमण करणे, दुखापत करणे, साधी दुखापत करणे, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, फौजदारीपात्र धाकदपटबद्दल शिक्षा, संगनमत करणे, अश्लील कृती करणे, गैर निरोधाबद्दल, हमला करणे, बलप्रयोग करणे, अवैद्यरित्या अग्णीशस्त्र आणि शस्त्र बाळगणे, अवैद्य शस्त्राची निर्मीती व विकी करणे, अधिसुचनांचे आणि हद्दपार आदेशांचे उल्लघंन करणे, अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकुण ०९ गुन्हे दाखल आहे.

# होर्डिंगवरील 'गायब' नेतृत्व आणि भाजपातील अंतर्गत अस्वस्थता

प्रतिनिधी १ मार्च

**वरुड :** शेंदुरजनाघाटमध्ये झळकलेल्या अभिनंदन होर्डिंग्जनी केवळ अभिनंदनाचे औचित्य साधले नाही, तर भारतीय जनता पक्षातील अंतर्गत वास्तवही उघड करून दाखवले आहे. सत्तेचा प्रकाश झगमगत असताना, त्याच प्रकाशात काही चेहरे जाणीवपूर्वक अंधारात ढकलले जात असतील, तर तो केवळ 'चुक' म्हणावा की राजकीय संदेश हा प्रश्न स्वाभाविकपणे उपस्थित होतो.

माजी खासदार रामदास तडस व माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांच्या निवडीबद्दलचे अभिनंदन होर्डिंग विंचुरकर चौकात झळकले; मात्र त्याच होर्डिंगवर विद्यमान आमदार चंदु उर्फ उमेश यावलकर आणि शहराध्यक्षांचे नाव–फोटो न दिसणे, हे अपघातासारखे वाटत नाही. राजकारणात अपघात क्वचित घडतात; बहुतांश वेळा ते नियोजनाचेच फलित असतात.




वरूड–मोर्शी मतदारसंघात गटबाजीची कुजबुज आजची नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपासून उमेदवारी वाटपापर्यंत मतभेद उफाळलेले आहेत. खा. डॉ. बोंडे गट आणि आ. यावलकर गटातील चुरस ही 'उघड गुपित'च. अशा पार्श्वभूमीवर होर्डिंगवरील 'गायब' नेतृत्व हे केवळ दुर्लक्ष नसून, आगामी राजकीय गणितांची चाचपणी असल्याची शंका बळावते. सत्तेत असताना समन्वय, शिस्त आणि एकजूट यांची अपेक्षा असते. पण येथे चित्र उलटे दिसते. ज्या कार्यकर्त्यांच्या खांद्यावर पक्ष उभा राहतो, त्यांनाच जर नेतृत्वाची दिशा अस्पष्ट वाटत असेल, तर त्याचा परिणाम थेट मतदारांपर्यंत पोहोचतो. आज होर्डिंगवर नाव गायब; उद्या धोरणांतून आवाज गायब—अशी साखळी निर्माण होऊ नये, हीच पक्षासाठी खरी चिंता असायला हवी. २०२९ अजून दूर आहे, पण राजकारणात वेळेची गणिते लवकर सुरू होतात. या एका होर्डिंगने भाजपातील अंतर्गत अस्वस्थता उघड केली आहे. प्रश्न इतकाच—ही अस्वस्थता पक्ष नेतृत्व वेळीच शांत करणार की पुढील निवडणुकांत तिचे पडसाद उमटू देणार? मतदार मात्र शांतपणे पाहत आहेतष्ठ आणि तेच शेवटी निर्णय देतात.

# राजापेठ पोलिसांनी केला गुन्ह्यातील फरार आरोपीस अटक

प्रतिनिधी १ मार्च

**अमरावती :** राजापेठ पोलिसांनी गुन्ह्यातील फरार आरोपीला अटक केली आहे.

सदर हकीकत अशी आहे की ,०१/१२/२०२५ रोजी फीर्यादी शुभम गोकुलदास जनबंधु वय-२९ वर्षधंदा भाजीपाला विक्री रा. जेवड नगर गल्ली क्र.१, राजापेठ अमरावती यांनी पोलीस स्टेशनला येवुन जबानी रीपोट दिला की रात्री ११.४० वा दरम्यान त्यांचे घरावर २०ते २५ मुले हातात तलवारी घेवुन घराचे बाहेरुन शिविगाळ करण्याची व तोडफोड करण्याची आवाज आली तेव्हा त्यांनी घराचे दार उघडुन पाहले तर २०-२५ मुले हातात तलवारी घेवुन घराचे समोर ठेवलेल्या गाडीवर वार करतांना दिसले तसेच त्यांनी त्यांचे घराचे दरवाज्यावर सुध्दा तलवारी ने वार केले तसेच परीसरात उभ्या असलेल्या जवळ पास १०-१२ गाड्यांचे नुकसान केले तसेच गल्ली मध्ये उभ्या असलेल्या इलेक्ट्रीक पोल मिटर असलेले बॉक्स फोडुन एकुण-५,०००,००/-रु चे नुकसान केले वरुन पोलीस स्टेशनला, अपक्र. ७४३/२०२५ कलम. १०९११०(१), ११९(२), ११९(३), ३२४(३),३२४(५),३२४(६), ६१ (अ), २९६, ३५१(२), भा.न्या.स. सहकलम ३(१), ३ (२), अनु. जाती. व अनु. जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि-१९८९ प्रमाणे गुन्हा नोद असुन तपासावर आहे. सदर गुन्हा घडला तेव्हा पासुन फरार असलेला आरोपी नामे साहील नरेश मेश्राम वय-२७ वर्ष रा. माताफैल बडनेरा ह.मु. सामरा नगर यास मोठ्या शिताफतीने अटक करण्यात आले आहे.



सदरची कार्यवाही ही राकेश ओला साहेब पोलीस आयुक्त अमरावती शहर, श्याम घुगे पोलीस उपायुक्त परि-०२ अमरावती शहर तसेच संजय खताळे सहाय्यक पोलीस आयुक्त राजापेठ विभाग अम.श. यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे राजापेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांचे नेतृत्वात, पोलीस स्टेशन राजापेठ येथील पोउपनी मिलींद हिवरे, पो. अमलदार सागर सरदार, पवन तिवारी, दिनेश भिसे यांनी केलेली आहे.

# अमरावती रेल्वे उड्डाणपुल निर्मिती प्रकल्पासाठी बजेटमध्ये १२५.३७ कोटींची मागणी

**आ. सुलभा खोडके यांच्या मागणीला मुख्यमंत्री ना. देवेन्द्रजी फडणवीस यांनी दर्शविली संमती**

प्रतिनिधी १ मार्च

**अमरावती :** गेल्या सहा महिन्यापासून अमरावती मधील रेल्वे उड्डाणपुल सर्वच प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याने शहरात वाहतूक व रहदारीची मोठी कोंडी निर्माण झाल्याने नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सदर उड्डाणपुलाच्या पुर्नबांधणीसाठी १२५.३७ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. येत्या ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार असल्याने अमरावती रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीसाठी १२५.३७ कोटींच्या निधीची तरतूद करण्याची मागणी अमरावतीच्या आमदार- सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. याबाबत मुख्यमंत्रीमहोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने अमरावती शहरातील राजकमल चौक ते रेल्वे स्टेशन पर्यंत उड्डाणपुलाच्या पुर्नबांधणीचा मार्ग अधिक प्रशस्त झाला आहे.



अमरावती ते बडनेरा या रेल्वे लाईनवर सन १९६३ च्या सुमारास रेल्वे उड्डाणपुलाची निर्मिती करण्यात आली. या उड्डाणपुलावरून शहराच्या चार भागाची वाहतूक जोडली गेली असून अमरावती शहरातील राजकमल चौक, हमालपुरा, रेल्वे स्थानक आणि जयस्तंभ चौकासारख्या महत्त्वाच्या केंद्रांना हा रेल्वे पूल जोडला असल्याने शहरवासीयांना वाहतूक व रहदारीची चांगली सुविधा होत होती. दरम्यान या पुलाचे स्ट्रक्चर ऑडिट मध्ये हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे सांगण्यात आल्याने गेल्या २५ ऑगस्ट २०२५ पासून या पुलावरून सर्वच प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली.

# साचलेले पाणी नसून ही साचलेली उदासीनता

प्रतिनिधी १ मार्च

**वरुड :** बेनोडा शहीद येथील रामकृष्ण कॉलनी, वार्ड क्रमांक ४ मधील वास्तव आज प्रश्न विचारणारे आहे. घरासमोर साचलेले पाणी हे केवळ अस्वच्छतेचे चिन्ह नसून, ते प्रशासनाच्या दुर्लक्षाचे जिवंत उदाहरण बनले आहे. नालीसारखी मूलभूत सुविधा नसल्यामुळे नागरिक रोजच आरोग्याच्या धोक्याखाली जगत आहेत आणि हे चित्र लोकशाहीला शोभणारे नाही.

साचलेल्या पाण्यामुळे दुर्गंधी, डासांची पैदास आणि आजारांचे सावट दाटले आहे. लहान मुले खेळताना, ज्येष्ठ नागरिक घराबाहेर पडताना, महिलांना दैनंदिन कामे करताना त्रास सहन करावा लागतो. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिक भयावह होते. हा प्रश्न काल-परवाचा नाही; तो



दीर्घकाळ प्रलंबित आहे म्हणजेच तो 'नैसर्गिक' नाही, तर 'निर्मित' आहे. या पार्श्वभूमीवर मनोहर वानखडे, राजू वावरे, मधुकर वावरे, दुर्गा बाविस्कर, लक्ष्मण बोडखे, सुनील गोरले, विनायक बोडखे आणि सुरेखा बोडखे यांनी ग्रामपंचायत बेनोडा शहीदकडे नालीच्या तातडीच्या कामासाठी मागणी केली आहे. ही मागणी केवळ एका कॉलनीची नसून, ती प्रशासनाच्या कर्तव्याची आठवण करून देणारी आहे.

# विद्यार्थ्यांचे प्रेम हीच चांगल्या शिक्षकाची पावती - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

**डॉ. प्रसाद वाडेगावकर, डॉ. वर्षा वाडेगावकर यांना सेवानिवृत्तीप्रसंगी समारंभपूर्वक निरोप**

प्रतिनिधी १ मार्च

**अमरावती :** चांगला शिक्षक कसा असतो, आणि सेवानिवृत्तीप्रसंगी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात असलेली उपस्थिती हेच प्रेम एका चांगल्या शिक्षकाची पावती असते, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अविनाश बोर्डे, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती माजी प्र-कुलगुरू व जीवतंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर, सौ. वर्षा वाडेगावकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.




कुलगुरू डॉ. बारहाते प्रथमत: मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा देवून पुढे म्हणाले, सध्या एआय चा काळ आहे व अशाही वेळी शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना अधिक प्रबळ करण्यासाठी प्रयत्नरत असतो. काळ कितीही बदलत असला तरी चांगला शिक्षक आपल्या विद्यार्थ्यासाठी झटत असतो, असे सांगून त्यांनी उभयतांना उज्ज्वल भविष्याकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी डॉ. प्रसाद वाडेगावकर, डॉ. वर्षा वाडेगावकर यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला, तर डॉ. वर्षा वाडेगावकर यांचा डॉ. स्वाती शेरेकर यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# खामगाव नगरपालिकेचा अर्थसंकल्प मंजूर!

**८ कोटी ६६ लाख ८९ हजार ४१३ रुपयांची शिल्लक अपेक्षित !**

प्रतिनिधी १ मार्च

**खामगाव :** खामगाव नगरपालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास शुक्रवारी नगरपालिका सभागृहात आयोजित विशेष सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली, तसेच २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकासही सभेत मान्यता देण्यात आली. मंजूर करण्यात आलेला अर्थसंकल्प पुढील प्रक्रियेसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे मंजुरीकरिता पाठविण्यात येणार आहे. अंतिम

बुलढाणा जिल्ह्यातील सर्वात मोठ्या खामगाव नगर पालिकेच्या सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार प्रारंभिक शिल्लक रक्कम ४ कोटी ४ लाख ६३ हजार ४१३ रुपये आहे. महसुली जमा ७१ कोटी ९१ लाख ६६ हजार रुपये, तर भांडवली जमा १२६ कोटी १४ लाख ५ हजार रुपये अपेक्षित आहे.यानुसार एकूण जमा १९८ कोटी ५ लाख ७१ हजार रुपये असून, प्रारंभिक शिल्लक धरून एकूण उपलब्ध निधी २०२ कोटी १० लाख ३४ हजार ४१३ रुपये इतका राहणार आहे. खर्चाच्या तरतुदीनुसार महसुली खर्चासाठी ७३ कोटी २ लाख ४० हजार रुपये, तर भांडवली खर्चासाठी १२० कोटी ४१ लाख ५ हजार रुपये प्रस्तावित आहेत. एकूण खर्च १९३ कोटी ४३ लाख ४५ हजार रुपये अपेक्षित असून, सर्व खर्चवजा जाता ८ कोटी ६६ लाख ८९ हजार ४१३ रुपये इतकी अखेरची शिल्लक राहणार असल्याचे नमूद करण्यात आले. सभेला नगराध्यक्षा अर्पणा फुंडकर, मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके, बांधकाम सभापती सतीशआप्पा दुडे, सभागृह नेता विजय उगले यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी आणि नगरपालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### पायाभूत सुविधांची उभारणी

अर्थसंकल्पात शहरातील रस्ते विकास, सार्वजनिक प्रकाश व्यवस्था, स्वच्छता व्यवस्थापन, विविध विकासकामे, नागरी सुविधा, कर्मचारी वेतन, जलसंवर्धन योजना तसेच पाणीपुरवठा प्रकल्पांसाठी तरतूद करण्यात आली आहे.

संतुलित आर्थिक नियोजनाद्वारे पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यावर भर देण्यात आल्याचे सभेत नमूद करण्यात आले.

## युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा



प्रतिनिधी १ मार्च

**खामगाव :** युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन मोठ्या आनंदाने व उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे प्राचार्य यांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. यानंतर शाळेचे प्राचार्य अनिरुद्ध अवचार यांनी मराठी भाषेचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी मराठी भाषेचा समृद्ध वारसा तसेच कुसुमाग्रज यांच्या साहित्यिक कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

कार्यक्रमात मराठी विषयाच्या शिक्षिका पूजा तायडे मॅडम तसेच शिवाजी सर यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रमांद्वारे कार्यक्रमाची शोभा वाढवली. इयत्ता पहिली व पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सुंदर मराठी कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संगीता देशमुख कु. कांचन लोखंडे जयश्री बुंदेले तसेच इतर शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

## पक्ष्यांसाठी जल पात्र हरी ओम जगदंबा उत्सव मंडळाचा उपक्रम

प्रतिनिधी १ मार्च



**खामगाव :** उन्हाळ्यात चिऊताई सह अन्य पक्षांची तहान भागवण्यासाठी भटकंतीची वेळ येऊ नये यासाठी महात्मा बसवेश्वर चौकातील हरीओम जगदंबा उत्सव मंडळातर्फे दाना व पाण्याची व्यवस्था करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. २७ रोजी या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. आहे जलपात्र व दानपत्र बन आले आणि त्यामध्ये पाणी व दाणे टाकण्यात आले. ज्या ठिकाणी पक्ष्यांचे वास्तव अधिक आहे अशा ठिकाणांचा शोध घेऊन जलपात्र व दाणेपात्र नित्यनेमाने रवी भोसले व मंडळाचे सहकारी त्या ठिकाणी जाऊन पाणी व दाणे दानपात्रात टाकणार आहे. त्यामुळे पक्षांना पोटाची भूक शमविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे धान्याच्या रूपाने धन्य खाण्यास मिळणार आहे. विशेष म्हणजे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी हे जलपात्र लावण्याआधी कोणत्या ठिकाणी पक्षांची किलकिलाट अधिक दिसून येत आहे त्या जागेची पाहणी केली आहे त्या ठिकाणी हे जेलपात्र झाडावर बांधलेले आहे शहरच्या आजूबाजूच्या परिसरात पक्षांचा अधिक वावर दिसतो अशा ठिकाणी मंडळातर्फे जलपात्र बांधण्यात आले आहे त्यात नित्यनेमाने पाणी व दाणे टाकण्याचा संकल्प मंडळाचे अध्यक्ष रवी भोसले मंडळाचे सचिव योगेश वानखडे व सहका-यांनी केला आहे.

सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. १ मार्च २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# भीषण अपघातात तीन अल्पवयीन मुलांचा मृत्यू

**तेल्हारा:** तेल्हारा शहराजनिक असलेल्या गुणवंत महाराज कॅनॉल जवळ दुपारी १२ वाजेच्या दरम्यान भीषण अपघात घडला या अपघातात मिळालेल्या माहितीनुसार तीन अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाला.

सविस्तर वृत्त असे की मालेगाव बाजार येथील तीन अल्पवयीन मुले हे दुचाकीने मालेगाव येथून तेल्हारा कडे येत होते विरुद्ध दिशेने येणाऱ्या आयशर ट्रक क्रमांक एम एच ३० बिडी ७१५८ यांचामध्ये जोरदार धडकीत दुचाकीवरील गणेश अतुरकर वय १७, साई वैष्णव वय १३, दर्शन वैष्णव १६ अशा तीन अल्पवयीन मुलांचा भीषण अपघातात मृत्यू झाला. आयशर ट्रक ड्रायव्हर घटनास्थळावरून फरार झाला असून तेल्हारा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन ची आमसभा संपन्न




**अकोला:** जिल्हा पेंशनर्स असोसिएशन'ची आमसभा शिवाजी महाविद्यालयाच्या वसंत सभागृहात झाली अध्यक्षपदी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सत्यनारायण बाहेती होते सचिव एकनाथराव उके , उपाध्यक्ष रामभाऊ बिरकड, सहसचिव

मोरेश्वर अंबुलकर, कोषाध्यक्ष विठ्ठल दांदळे , बुलढाणा जिल्हा पेंशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मधुकरराव पराड, प्राचार्य बी. डी. सपकाळ, प्रा. रामदास शिंगणे, सुखदेव मसने, रामकृष्ण बागडे , प्रल्हाद सोनोने , प्रल्हाद इंगळे, अशोक इंगोले उपस्थित होते. सभेत मागील वर्षीचे इतिवृत्त, हिशेबपत्रके , अंदाजपत्रक व अंकेक्षक नियुक्ती इ. विषयांवर चर्चा करण्यात आली. संघटनेद्वारे दिले जाणारे निवृत्त सेवा पुरस्कार प्रा. किशोर बुटोले , देवीदास निखारे, प्रमिला वाघमारे व वामन हिरुळकर यांना प्रदान करण्यात आले.

## राजेश हुळहुळे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**अडगांव बु. :** अखिल भारतीय महानुभाव पुजारी भोपे



महासभा संचलित अकोला जिल्हा कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली. यामध्ये अडगांव बु येथील तरुण तडफदार व्यक्तिमत्व राजेश अर्जुनराव हुळहुळे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राजेश हुळहुळे हे सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात नेहमी अग्रेसर असुन समाजाच्या प्रगतीसाठी आणि महानुभाव पंथाच्या कार्यासाठी त्यांनी दिलेले योगदान लक्षात घेऊन ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

## निधन वार्ता

### रमेश गावंडे

**हिवरखेड:** येथील रमेश



विठ्ठलराव गावंडे (६५) यांचे २८ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

# पहाडसिंगी रस्त्यावर पुलाचा भाग कोसळला

प्रतिनिधी १ मार्च

**पातूर:** तालुक्यातील पहाडसिंगी-डोणगाव मार्गावरील मुख्य रस्त्यावरील पुलाच्या बांधकामातील गंभीर उघडकीस प्रकार आला असून, प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. काम सुरू असतानाच पुलाचा एक भाग कोसळल्याने बांधकामाच्या दर्जाबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.

अभियंता कामाच्या ठिकाणी अनुपस्थित राहिल्याने संपूर्ण काम सुपरवायझरच्या भरोशावर सुरू आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. पुलाच्या कामात लोहाचे अत्यंत कमी प्रमाणात वापर, व निकृष्ट साहित्याचा वापर, करून लाखो रुपये हडपण्याचा प्रकार सुरू आहे. लाखो रुपयांचा निधी खर्च होत असताना तांत्रिक देखरेखीचा अभाव व



अभियंता फिरकतनसल्याने पुलाचे काम थातूरमातूर केले जात असल्याचे उघड झाले आहे.सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर, राहुल गवई व ग्रामस्थांनी प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात शनिवारी निषेध व्यक्त केला, व संबंधित अभियंता, कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. निकृष्ट कामामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडू शकली असती, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला. प्रशासनाने उच्चस्तरीय समिती गठित करून चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

**अभियंता फिरकेना : वरिष्ठांचे दुर्लक्ष का ?**

अकोला जिल्ह्यातील अतिदुर्गम भागाच्या गावांना बुलढाणा जिल्ह्याशी जोडण्यासाठी पुलाच्या कामासाठी शासनाने लाखो रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला मात्र अभियंता फिरकत नसल्याने शासनाच्या लाखो रुपयांची उधळपट्टी होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

# आखतवाडा येथे गोठ्याला आग, बैल ठार

प्रतिनिधी १ मार्च

**अकोला:** आखतवाडा येथील गणेश भगत यांच्या गोठ्याला शुक्रवारी रात्री आग लागली. आगीत होरपळून एक बैल मरण पावला तर एक जखमी झाला. भगत यांचे बरेच नुकसान झाले. आग कशी लागली याचा तपास सुरू आहे.

मंडळ अधिकारी व तलाठी यांना घटनेविषयी माहिती दिली. तलाठ्यांनी घटनास्थळी पंचनामा केला. भगत यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली जात आहे.



# शिवनाद स्वराज्याचा उद्घोष वक्तृत्व स्पर्धेत संकल्प गाडगे प्रथम

प्रतिनिधी १ मार्च

**पातुर:** छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शिवरायांना विचारांची जयंती समर्पित करण्याच्या उद्देशाने ठशिवनाद स्वराज्याचा उद्घोषठ या भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन लोकमान्य टिळक गणेशोत्सव मंडळ पातुरच्या वतीने करण्यात आले होते. या वक्तृत्व स्पर्धेमध्ये संकल्प शंकर गाडगे यांने आपल्या वक्तृत्व कौशल्याच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावला असून संकल्पला ट्रॉफी, प्रशस्तीपत्र व रोख ३००० हजार




रुपयाचे बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते त्याचा गौरव करण्यात आला.

स्पर्धेला परीक्षक म्हणून इतिहासाचे गाढे अभ्यासक प्रा. अरविंद भोंगळे, प्रा.उज्वला मनवर, युवा पुरस्कार विजेते विशाल राखोडे, मुखाडे होते.शिवाजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित शिवभक्त या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# आरटीई प्रवेशातील अंतराची अट 'बेकायदेशीर'; एम.पी.जे.ची अट रद्द करण्याची मागणी

प्रतिनिधी १ मार्च

**आलेगाव:** आरटीई कायद्यानुसार २५ टक्के आरक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेवरून राज्यात वाद निर्माण झाला आहे. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेल्या शासकीय निर्णयानंतर १७ फेब्रुवारीपासून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली; मात्र सामाजिक कार्यकर्ते, सिव्हिल सोसायटी संघटना आणि पालक गटांनी नव्या मार्गदर्शक तत्त्वांवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

एम.पी.जे.ने आरोप केला आहे की नव्या आदेशानुसार शाळा निवडीसाठी १ किलोमीटर अंतराची अट लागू करण्यात आली



आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी खासगी शाळांचे पर्याय मर्यादित झाले आहेत. तसेच नव्या परिपत्रकानुसार प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याचा अधिकार थेट खासगी विनाअनुदानित शाळांना देण्यात आला आहे, ज्यामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्हे उपस्थित झाले आहे.

यापूर्वी कागदपत्र पडताळणीसाठी गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली सुमारे २० सदस्यीय स्वतंत्र समिती स्थापन केली जात होती. या समितीत शिक्षक, पालक प्रतिनिधी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी सहभागी असत. समितीने पडताळणी केल्यानंतर शाळांना प्रवेश नाकारता येत नव्हता, त्यामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक मानली जात होती. नव्या नियमांमध्ये ही व्यवस्था रद्द करण्यात आली आहे.

संघटनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन अंतरावर आधारित अट तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

निवेदन देताना मोहम्मद मुश्ताक मोहम्मद इस्माईल, अजीज खान शरीफ खान, नितीन घायवट, अहेफाज खान काले खान, सैय्यद साउद सैय्यद इसमोद्दिन मोहम्मद साजिद मोहम्मद सादिक, रुपेश नवघरे, शेख सईद शेख बशीर, मोहम्मद लुकमान मोहम्मद शब्बीर यांचा निवेदन देणा-यात समावेश आहे.

# १६ गायी चोरी प्रकरणी गुन्हा दाखल

प्रतिनिधी १ मार्च

**हिवरखेड :** पोलिस स्टेशन अंतर्गत वारखेड येथील रहिवास फिर्यादी हरिदास म्हसाये यांनी पोलिस स्टेशन मध्ये जबानी तक्रार दिली आहे, मी व माझ्या गावातील आणखी काही लोकांनी गायीचा चारापाणी करण्यासाठी आरोपी कैलास मोरे, सचिन पालटे, अक्षय भास्कर रा करीरुपागड यांना दिल्या होत्या, यांनी आमच्या गायी परत केल्या नाही, व कुठे डोबून ठेवल्या सांगत नाहीत, परस्पर माहिती मिळाली यांनी ह्या गायी व्यापाऱ्याला विकल्या या प्रकरणी पोलिसांनी आरोपी विरुद्ध कलम ३१६'२ (३,५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला, ह्या १६




गायी होत्या अंदाजे किमत रुपये २लाख ६०, हजार रुपये किंमतीच्या असल्याचे समजून आले, याबाबत हिवरखेड पोलिस तपास करीत आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा ६ मार्च रोजी

प्रतिनिधी १ मार्च

**अकोला:** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी राजे भोसले यांची ६ मार्च २०२६ रोजी तिथीनुसार जयंती साजरी केली जाणार आहे. शिवजयंतीचे ३२ वे वर्ष असून हा जन्मोत्सव सोहळा भव्य दिव्य स्वरूपात पार पडावा यासाठी वानखडे नगर स्थित कर्ता हनुमान मंदिराच्या प्रांगणात शिवप्रेमींची बैठक झाली.

जय बाभळेश्वर सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करण्यात आली. बैठकीला प्रभाग क्रमांक ८ मधील नगरसेविका माधुरी क्षीरसागर, नगरसेवक राहुल धोटे, मनोज पाटील, प्रभाग क्रमांक १० मधील नगरसेवक नितीन ताकवाले, मनसेचे जिल्हाध्यक्ष



**५ मार्च रोजी महिलांची मशाल यात्रा**

गुरुवार ५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी नगरस्थित आई तुळजाभवानी मंदिर येथून महिलांच्या मशाल रॅलीचे आयोजन केले जाणार आहे. ६.३० वाजता मशाल रॅलीचा प्रारंभ होईल. मशाल यात्रेचा समारोप जय बाभळेश्वर मंदिराच्या प्रांगणात करण्यात येईल. यावेळी उपस्थित महिला व युवतींच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या मूर्तीचे पूजन व त्यानंतर आरती केली जाणार आहे.

राजेश काळे, मनसेच्या महिला जिल्हाध्यक्ष प्रशंसा अंबेरे, माजी स्थायी समिती सभापती विलास शेळके, रवी गोतमारे, कर्ता हनुमान मंदिराचे सर्वसेवाधिकारी सुभाष म्हैसने, माजी नगरसेवक सतीश ढगे, मनोज गायकवाड, योगेश गोतमारे, उद्धवसेनेचे निवासी उपजिल्हाप्रमुख अतुल पवनीकर, जिल्हासंघटक भूषण भिरड,

**६ मार्च रोजी शिवजन्मोत्सव सोहळा**

६ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता जय बाभळेश्वर मंदिराच्या प्रांगणात तयार करण्यात आलेल्या भव्यदिव्य आकर्षक किल्ल्यावर विराजमान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून शिवजन्मोत्सव सोहळ्याला प्रारंभ केला जाणार आहे. यावेळी व्यासपीठावर उपस्थित शहरातील सामाजिक,क्रीडा, राजकीय तसेच प्रशासकीय क्षेत्रातील विविध मान्यवरांचा सत्कार केला जाणार आहे. सायंकाळी ७ वाजता डाबकी रोड परिसरात छत्रपती शिवाजी महाराज, मासाहेब जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारलेल्या महिला, युवती व चिमुकल्या मावळ्यांची मिरवणूक काढली जाणार आहे. या मिरवणुकीचा समारोप छत्रपती शिवाजी नगरस्थित भाजी बाजार येथील शिवरायांच्या प्रतिमेसमोर करण्यात येईल. शनिवार ७ मार्च रोजी रात्री ८ वाजता शिवपूजनाने शिवजन्मोत्सव सोहळ्याचा समारोप होईल.

डाबकी रोडवासी कावड मंडळाचे सर्वसेवाधिकारी संदीप पवार, आकाश कवडे, बालू गायकवाड, गुड्डू चोपडे, किरण मेटांगे, गजानन टिकार, सुनील महल्ले, नितीन वाडीकर, रवी दुतोंडे, वसंता मानकर, आशिष जानोरकार, सुरज शेळके, गणेश नंदनवार, धीरज सरोदे, रोहित ईचे, शुभम भिरड, रुपल पवार, हिषिकेश भिरड,

# आयोध्येशी विदर्भाचे रक्ताचे नाते - ज्ञानेश्वर महाराज वाघ

प्रतिनिधी १ मार्च

**अकोट:** मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीरामचंद्रांचे वडील राजा दशरथांच्या मातोश्री अज राजांची पत्नी इंदुमती कौंडण्यपूर नरेशांची मुलगी अर्थातच विदर्भ राजकन्या असल्यामुळे अयोध्येशी विदर्भाचे रक्ताचे नाते असल्याचे भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ म्हणाले.

बालयोगी श्री सदानंद महाराज ज्ञानेश्वरी पारायण महोत्सव समितीच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी अवतिर्णोत्सवाचे औचित्य साधून आयोजित ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात श्रीधाम अयोध्या येथे ठआप तरे त्याकी कोन बऱ्हाई त् औरनकूं भलो नाम धराई त्ठ या संत तुकाराम महाराजांच्या अवधी हिंदी भाषेतील अभंगावर हिंदी भाषेतच केलेल्या किर्तन प्रसंगी



बोलत होते.

त्यांनी भारतीय पौराणिक इतिहासात विदर्भाचा अयोध्येशी असलेल्या नातेसंबंधाचे अनेक दाखले दिलेच त्याचबरोबर त्या नात्याचा नवीन अध्याय म्हणजे वर्तमानातील राम मंदिराच्या दरवाजा करिता वापरलेले सागवानी लाकूड सुद्धा चंद्रपूर अर्थातच विदर्भातूनच आल्याचा सुद्धा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

बालयोगी सदानंद महाराज तुंगारेश्वर यांच्या समवेत शांतीब्रह्म संत श्री एकनाथ महाराज यांचे १४ वे वंशज श्रीयुत योगीराज महाराज ,श्री विश्वनाथ महाराज वारिंगे व भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ यांची अयोध्या नगरीतून रथात बसवून भव्य प्रमाणात शोभायात्रा काढण्यात आल्याचे श्री ज्ञानेश्वर महाराज भालतिलक हे कळवितात.

# सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये मराठी राजभाषा गौरव दिन साजरा

प्रतिनिधी १ मार्च

**अकोट:** सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, लुनकरण डागा,प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, शाळेचे प्रा. द्वारिका प्रसाद बसेर, कविता मिश्रा, विभाग प्र. मोनिका गावंडे, मराठी शिक्षिका प्रितल रोही, प्रीती चिकटे,रूपाली



कुटे, प्रिया वाडोकर, मोहिनी लोंढे व्यासपीठावर उपस्थित होते.

मान्यवरांनी सरस्वती तसेच कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन केले.या कार्यक्रमात नर्सरी ते तिसरीच्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगितले.

त्यानंतर मराठी शिक्षिका मोहिनी लोंढे यांनी मराठी भाषेचा इतिहास मुलांना सांगितला. मराठीच्या शिक्षिका प्रितल रोही यांनी वि. वा. शिरवाडकर यांचे साहित्य व त्यांचे लेखन कौशल्य याबद्दल माहिती दिली.

# प्रा.डॉ. मोहन खडसे यांना राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी १ मार्च



**अकोला :** स्तंभलेखक प्रा. डॉ. मोहन खडसे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. मराठी साहित्यातील उत्कृष्ट साहित्य निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी दिले जाणारे मराठी भाषा संवर्धन संस्थेचे राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार २०२४ जाहीर करण्यात आले. मराठी भाषा संवर्धन संस्थेच्या वतीने एकूण आठ साहित्य प्रकारांमध्ये घोषित पुरस्कारांमध्ये आत्मचरित्र विभाग-दौशाड-डॉ. नंदकुमार राऊत, नाशिक, बालसाहित्य विभाग-१६९५ स्मार्ट रोबो ए आय आणि औरंगजेब-सुरेश वांदिले, मुंबई, आगळ्या वेगळ्या कथा- बबन शिंदे, कळमनुरी, कथासंग्रह विभाग-पोलीस मन-अजित देशमुख, मुंबई बयनामा-बा.बा.कोटंबे परभणी, ललित विभाग- गुपित आनंदाचं-डॉ. मोहन खडसे अकोला, (मधुश्री प्रकाशन, पुणे) जीवनसाथीचा वियोग आणि विवेकनिष्ठ विचारसरणी-अलका काकडे पुणे, समीक्षा विभाग नामदेव ढसाळ यांची कविता आस्वाद आणि चिकित्सा- डॉ. विनोद राऊत नागपूर, साहित्यसमीक्षा आणि समाजचिंतन-संपादक डॉ. रुपेश कऱ्हाडे दिग्रस, कादंबरी विभाग घाणी भाग दोन-कविता पाचंग्रे शिरूर, वचपा-मोतीराम राठोड, नांदेड, कविता विभाग-सिझर न झालेल्या कविता- डॉ. सुनील पवार, मेहकर, दंगल होतेच कशी ?- गौतम ढोके-बडनेरा, अनुवादीत साहित्य- डॉ. संजय बोरुडे, अहिल्यानगर, पुरस्कार प्राप्त सर्व लेखकांचे मराठी भाषा संवर्धन संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष सुरेश पेंढरवाड, कार्याध्यक्ष नागोराव कोम्पलवार, सचिव गणेश बुटे यांचा समावेश आहे. पुरस्कार वितरण सोहळा येत्या जून महिन्यात होणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष सुरेश पेंढरवाड, कार्याध्यक्ष नागोराव कोम्पलवार, सचिव गणेश बुटे यांनी कळविले आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालावधीत मराठी भाषेत प्रकाशित झालेल्या पुस्तकांच्या प्रवेशिका मराठी भाषा संवर्धन संस्था ढाणकीच्या वतीने मागविण्यात आल्या होत्या.

**सायं दै. सिटी न्यूज सुपरफास्टच्या मालकी व तपशिलाबाबत माहिती तक्ता**

**फार्म नं. ४**

| | |
|---|---|
| **प्रकाशनाचे स्थळ** | : सायं दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल गांधी रोड अकोला. |
| **प्रकाशन** | : सायं दैनिक |
| **मुद्रणालय** | : भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ |
| **संपादकांचे नाव** | : प्रदीप पुंडलीकराव देशमुख |
| **राष्ट्रीयता** | : भारतीय |
| **मालकाचे नाव** | : प्रदीप पुंडलीकराव देशमुख |
| **पत्ता** | : उत्सव संकुल गांधी रोड, अकोला. |

मी प्रदीप पुंडलीकराव देशमुख, मालक सायं दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट असे जाहिर करतो की वरील तपशिल माझ्या माहिती प्रमाणे व विश्वासा प्रमाणे खरी आहे.

**दि. १ मार्च २०२६** **- प्रदीप पुंडलीकराव देशमुख (प्रकाशकाची सही)**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. १ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# स्कुल बसचा अपघात; 12 विद्यार्थी सुखरूप बचावले

प्रतिनिधी १ मार्च



**यवतमाळ** : अंजी नाईक येथे मंगळवारी सायंकाळी सहाच्या सुमारास शाळेची बस रस्त्याच्या कडेला घसरून अपघात झाला. सुदैवाने बसमधील १२ विद्यार्थी सुखरूप बचावले असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र या घटनेमुळे विद्यार्थ्यांसह पालकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आर्णी येथील स्वामी विवेकानंद स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेची (क्र. एमएच ४० बीजी २०२६) बस सायंकाळी विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी अंजी नाईक व भांबोरा परिसरात जात होती. संबंधित मार्गावर सध्या रस्त्याचे काम सुरू असून सुमारे सात मीटरपर्यंत रस्ता खोदण्यात आला आहे.

रस्त्याच्या दुतर्फा मुरूम टाकण्यात आला असला तरी कडेला खोल खड्डे असल्याने वाहने चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. याच दरम्यान चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या कडेला झुकली. बस झुकताच विद्यार्थ्यांमध्ये घबराट पसरली; काही विद्यार्थ्यांनी आरडाओरडा केल्याने परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. स्थानिकांनी तत्काळ बसमधील विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढले. सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही.

घटनेनंतर काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. माहिती मिळताच पालकांनी घटनास्थळी गर्दी केली. दोन टँकरच्या साहाय्याने सायंकाळी उशिरा बस बाहेर काढण्यात आली. अपूर्ण रस्ते कामामुळे अशा घटना घडत असल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली असून संबंधित विभागाने तातडीने सुरक्षेची उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

## डीजेच्या अति वापरामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर धोका

प्रतिनिधी १ मार्च

**यवतमाळ** : सार्वजनिक उत्सव, मिरवणुका आणि लग्नकार्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या हाय-इंटेंसिटी लेझर लाईट्स आणि शक्तिशाली डीजे साऊंड सिस्टिममुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे चित्र समोर येत आहे. मनोरंजनाच्या नावाखाली सुरू असलेला हा अतिरेक आता डोळ्यांचे गंभीर आजार, कायमस्वरूपी अंधत्व, बहिरेपणा आणि ध्वनी प्रदूषण यांसारख्या धोक्यांना आमंत्रण देत आहे. नेत्ररोग तज्ज्ञांच्या अहवालानुसार, उच्च क्षमतेच्या लेझर किरणांचा थेट संपर्क केवळ काही सेकंदातच डोळ्यांच्या रेटिनाला जाळून टाकू शकतो. यामुळे मॅक्युलर होलसारखे गंभीर आजार उद्भवून व्यक्ती कायमची अंध होण्याचा धोका असतो. अलीकडे अनेक मिरवणुकांमध्ये लेझरच्या अति वापरामुळे तरुणांची दृष्टी गेल्याच्या धक्कादायक घटना घडल्या आहेत.

याचप्रमाणे, डीजेच्या अति तीव्र आवाजामुळे हृदयविकाराचा त्रास असलेल्या रुग्णांना, लहान मुलांना आणि वृद्धांना प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. दीर्घकाळ तीव्र आवाजाच्या संपर्कात राहिल्याने कायमस्वरूपी बहिरेपणाचा धोका निर्माण होतो. तसेच, कंपनामुळे अनेक व्यावसायिकांच्या दुकानांच्या काचा हादरून फुटण्याच्या घटना घडत असून, ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे.

# रंगोत्सवाची धूम; होळीच्या रंगात आर्णीची बाजारपेठ फुलली



प्रतिनिधी १ मार्च

**आर्णी** : शहरातील मुख्य बाजार, चौक आणि गल्लीबोळा परिसरात होळीचा उत्सव सुरू होण्याआधीच बाजारपेठ रंगांनी बहरली आहे. येत्या २ व ३ मार्चला होळी साजरी होणार असल्याने दुकाने रंग, पिचकारी, फुगे, गुलाल आणि सणासंबंधी वस्तूंच्या आकर्षक विक्रीस सजली आहेत.

लहान मुलांसाठी कार्टून आकाराच्या पिचकारी उपलब्ध असून तर तरुणांसाठी विविध रंग आणि पिचकारींची मालिका नागरिकांचा आकर्षण केंद्र ठरत आहे. गुलाबी, हिरवे, पिवळे, निळे अशा रंगांच्या उधळणीने बाजारपेठ उत्सवी आणि रंगीबेरंगी दिसत आहे. काही दुकानदारांनी नैसर्गिक आणि पर्यावरणपूरक रंग विक्रीस ठेवले असून त्याला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

महिलांसाठी पारंपारिक साड्या, दागिने तसेच होळी पूजेसाठी लागणारे साहित्य मोठ्या प्रमाणावर विकले जात आहे. गोड पदार्थांसाठी मिठाईच्या दुकानदारांनी विशेष तयारी केली असून पुरणपोळी, करंजी आणि इतर पारंपारिक पदार्थांसाठी ऑर्डर्स सुरू आहेत.

२ मार्चला होळी पूजन आणि ३ मार्चला धुळवड साजरी होणार असल्याने नागरिक खरेदीसाठी व्यस्त आहेत. एकूणच, येत्या होळीच्या स्वागतासाठी आर्णी शहर सज्ज झाले असून बाजारपेठेत सणाची रंगत आणि उत्साह स्पष्टपणे जाणवतो. शहरातील प्रत्येक कोपऱ्यात रंगांचा उत्साह आणि सणाची तयारी पाहायला मिळत आहे, त्यामुळे नागरिक आतुरतेने या उत्सवाची वाट पाहत आहेत.

# सीसीआयची मुदतवाढ म्हणजे शेतकऱ्यांची क्रूर थट्टा; शेवटच्या बोंडापर्यंत खरेदीची मागणी

प्रतिनिधी १ मार्च

**यवतमाळ** : केंद्र शासनाने कापूस खरेदीसाठी दिलेली मुदत १५ मार्चपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला असला, तरी ही मुदतवाढ म्हणजे कापूस उत्पादक शेतकऱ्यांची "क्रूर चेष्टा" असल्याची टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते मनीष जाधव यांनी केली आहे. शेवटच्या बोंडापर्यंत कापूस खरेदी न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

चालू खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये कृषी मूल्य आयोगाने कापसाला ८,०१० रुपये प्रतिक्विंटल असा आधारभूत हमीभाव जाहीर केला. मात्र ओला दुष्काळ व अतिवृष्टीमुळे उत्पादनात मोठी घट झाली. ५० क्विंटल उत्पादन देणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतात यंदा अवघे १५ क्विंटल कापूस निघाल्याचे उदाहरण पुढे येत आहे. सोयाबीनसह इतर पिकांचेही मोठे नुकसान झाले. दरम्यान, केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सीसीआय व नाफेड यांच्या खरेदी केंद्रांबाबतही शेतकऱ्यांत नाराजी आहे. यंदा 'किसान कपास' ॲपद्वारे नोंदणी सक्तीची करण्यात आली; मात्र आदिवासीबहुल यवतमाळ जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल नसल्याने ते नोंदणीपासून वंचित राहिले. जनजागृतीचा अभाव, प्रतवारीतील विलंब, गोडाऊन व बारदाण्याची कमतरता अशा कारणांनी खरेदी ठप्प झाल्याचा आरोप संघटनेने केला आहे. २७ फेब्रुवारी रोजी सीसीआयने खरेदी केंद्र बंद करण्याची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटली. अर्थसंकल्पीय अधिवेशनातही हा मुद्दा उपस्थित झाला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करून सीसीआयचे अध्यक्ष ललित कुमार गुप्ता व केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्याकडे मुदतवाढीची मागणी केली. त्यानुसार १५ मार्च २०२६ पर्यंत अधिकृत नोंदणी असलेल्या शेतकऱ्यांचा कापूस हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय जाहीर झाला. राज्यात सुमारे १ लाख ८३ हजार शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. मात्र नोंदणी न झालेल्या शेतकऱ्यांचा कापूस कोण खरेदी करणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. भाववाढीच्या प्रतीक्षेत अनेकांनी कापूस घरात साठवून ठेवला आहे. अमेरिकेसोबतच्या कृषी व्यापार करारानंतर खासगी व्यापाऱ्यांनी दर पाडल्याचा आरोपही जाधव यांनी केला. नोंदणीपासून वंचित शेतकऱ्यांना 'किसान कपास' ॲपद्वारे तातडीने नोंदणीची संधी द्यावी आणि किमान १५ एप्रिल २०२६ पर्यंत खरेदी सुरू ठेवावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. अन्यथा खासगी व्यापारी व दलालांकडून आर्थिक लूट होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

# 'लव्ह जिहाद-विरोधी कायदा' लागू करावा; आर्णीत हिंदू जनजागृती समितीची मागणी

प्रतिनिधी १ मार्च

**आर्णी** : हिंदू समाजाच्या सुरक्षा आणि महिलांच्या रक्षणासाठी हिंदू जनजागृती समितीने आज आर्णी येथे तहसिलदार वैशाख वसंत वाहुरवाघ यांना निवेदन देत महाराष्ट्रात उत्तर प्रदेश व उत्तराखंडसारखा कठोर आणि अजामीनपात्र 'लव्ह जिहाद व अवैध धर्मांतर विरोधी कायदा' तात्काळ लागू करण्याची मागणी केली.

निवेदनात म्हटले आहे की गेल्या दीड-दोन वर्षांपासून संपूर्ण महाराष्ट्रात 'लव्ह जिहाद' आणि 'अवैध धर्मांतर'विरोधात सकल हिंदू समाज, हिंदू जनजागृती समिती आणि विविध महिला संघटना सक्रिय आहेत. या काळात लाखो माता-भगिनी आणि हिंदू बांधवांनी जनआक्रोश मोर्चे काढले, परंतु राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनानंतरही या घटनांची तीव्रता वाढली आहे.

निवेदनात पालघरची श्रद्धा वालकर, झारखंडची रबिका पहाडन, कर्नाटकातील नेहा हिरेमठ या घटनांचा उल्लेख करून सांगितले की 'लव्ह जिहाद' हे केवळ प्रेमाचे नाटक नसून संघटित, नियोजित आणि वैचारिक युद्ध आहे.

महिलांना धर्मांतरासाठी ओढणे, लैंगिक शोषण करणे, विरोध केल्यास हत्या करणे यासारखे प्रकार दररोज घडत आहेत.

समितीच्या प्रमुख मागण्यांमध्ये जन्मठेप शिक्षा असलेला कठोर कायदा, जिल्ह्यातील DySP नेतृत्वाखाली विशेष तपास पथक, ६ महिन्यांत निकाल देणारी जलदगती न्यायालये, महाराष्ट्रातील १,७८,४००+ बेपत्ता मुलींचा शोध, तसेच आंतरधर्मीय विवाहासाठी पूर्वपरवानगी बंधनकारक करण्याचे उपाय यांचा समावेश आहे.

निवेदन हे सौ. रुपाली धोंगडे, बेबी जाधव, सौ. मनिषा शेंडे, सौ. मनिषा कोलते, सौ. वर्षा कोलते, रेखा आगिरकर, सौ. ज्योती अर्धापूरकर, विवेक पांडे, राजेश माहेश्वरी, बी. बि. जाधव यांच्या हस्ते देण्यात आले. समितीने म्हटले की, "जर नारी सुरक्षित राहिली, तर राष्ट्र सुरक्षित राहील. सरकारने दिलेले आश्वासन पूर्ण करावे; महाराष्ट्राला लव्ह जिहाद मुक्त करावे."

## मराठी राजभाषा गौरव दिन

प्रतिनिधी १ मार्च

**दारव्हा** : जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हाच्या मराठी विभागातर्फे मराठी साहित्याचा मानदंड असलेले वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्मदिवस 'मराठी राजभाषा गौरव दिन' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यादव सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रामधन हिरे होते, तर मार्गदर्शक म्हणून डॉ. पुरुषोत्तम बांडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी मराठी भाषेचे महत्त्व तसेच महाराष्ट्रात मराठी मातृभाषेचे योगदान किती महत्त्वपूर्ण आहे, याविषयी सविस्तर विवेचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षया जयसिंगपूरे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. रमेश खंडारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. राजेश गेडाम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. जयवंत जुकरे, प्रा. डॉ. प्रिती ठाकरे, प्रा. कु. रुपाली कणसे, नितेश कदम, सचिन माटोडे, सतीश सरतापे, सोमराज लोहकरे, विनोद कंटाळे, पायल पवार, प्रथमेश आडे, विशाल उमरे, शारदा भगत, तन्वी खाडे, पायल राऊत, भूमिका चव्हाण, वैष्णवी नाटकर, राहुल आडे, पायल राठोड, रिद्धी आवारे, कोमल लोहकरे, प्रीती राठोड व वैष्णवी राठोड आदींचे सहकार्य लाभले.

# उमरखेडमध्ये बॉडी बिल्डिंग स्पर्धा

प्रतिनिधी १ मार्च




**उमरखेड** : यवतमाळ जिल्हा बॉडी बिल्डर्स अँड फिटनेस असोसिएशनच्या मार्गदर्शनात सोनू सोनटक्के मित्र मंडळच्या वतीने पाच मार्च, गुरुवार रोजी उमरखेडमध्ये जिल्हास्तरीय बॉडी बिल्डिंग स्पर्धा आयोजित केली जाणार आहे. हा कार्यक्रम भाजपाचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने घेतला जात आहे.

स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्यांसाठी औदुंबर श्रीसाठी २१,००० रुपये, बेस्ट पोझरसाठी १०,००० रुपये, तर बेस्ट मसल मॅनसाठी ७,००० रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे. स्पर्धा दोन गटात होणार आहे – ६० किलो आतील आणि ६० किलो वरील, आणि प्रत्येक गटातून पाच बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रथम बक्षीस ११,००० रुपये, द्वितीय ७,००० रुपये, तृतीय ५,००० रुपये, चतुर्थ ३,००० रुपये, पाचवे २,००० रुपये असे ठेवण्यात आले आहे. स्पर्धेला मार्गदर्शक म्हणून अविनाश लोखंडे (यवतमाळ) आणि पंच म्हणून नितीन गावंडे (कारंजा) व वैभव फुके (पुसद) रहाणार आहेत. स्पर्धा VBBFAच्या नियमांतर्गत होईल आणि सहभागी स्पर्धकांना आधार कार्ड व झेरॉक्ससह येणे आवश्यक आहे. पंचांचा निर्णय अंतिम राहील आणि सर्व स्पर्धक स्वतःच्या जबाबदारीवर सहभागी होतील.

स्पर्धेचे ठिकाण जेठमलजी माहेश्वरी खुले नाट्यगृह, महागाव रोड, उमरखेड आहे. सायंकाळी साडेपाच ते दहा वाजेपर्यंत स्पर्धा पार पडणार असून, वजन मोजणी दुपारी दोन ते पाच वाजेपर्यंत होईल.

तालुक्यातील विविध जिममध्ये युवक स्पर्धेची तयारी करताना दिसत आहेत. अशोक, किरण, आकाश, सागर, सचिन यांसारखे जिमपट्टू स्पर्धेसाठी सराव करत आहेत. प्रथमच उमरखेडमध्ये अशी स्पर्धा होणार असल्याने युवकांमध्ये उत्सुकता भरून आली असून, या माध्यमातून निरोगी आणि तंदुरुस्त जीवन जगण्याची प्रेरणा मिळणार आहे.

## आर्णीत शिवमहापुराण कथा : प्रदीप मिश्रा यांचे अद्भुत सुमधुर वाणीतील कार्यक्रम




प्रतिनिधी १ मार्च

**आर्णी** : शहरातील श्री बहिरमदेव सेवा समिती ट्रस्ट यांच्या वतीने आर्णी शहरात शिवमहापुराण कथा आयोजित करण्यात आली आहे. ही कथा ३० मार्च ते ५ एप्रिल दरम्यान स्थानिक प्रिया नर्सरी समोरील श्री भारती यांचे शेती परिसरात होणार आहे.

अंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथाकार श्री प्रदीपजी मिश्रा आपल्या सुमधुर वाणीमध्ये भक्तांना कथा सांगतील. कार्यक्रमासाठी परिसरात जवळपास तीन लाख चौरस फूटाचा भव्य मंडप उभारण्यात येणार असून, कामाला लगेच सुरुवात होईल.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सुनिश्चित करण्यासाठी विविध समित्या गठीत केल्या आहेत आणि तमाम आर्णी व परिसरातील नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षा आहे.

सदरचा भव्य दिव्य सोहळा भक्तांसाठी अध्यात्मिक आनंदाचे आणि ऐतिहासिक कथा अनुभवाचे साधन ठरणार आहे.

# विदर्भ क्षेत्रीय ग्रामीण बँकेच्या व्यवस्थापकपदी प्रतीक्षा जाधव

प्रतिनिधी १ मार्च



**उमरखेड** : आदर्श विद्यालय कोठारी येथे कार्यरत शिक्षक पंडित जाधव सर यांची कन्या प्रतीक्षा पंडित जाधव यांची विदर्भ क्षेत्रीय ग्रामीण बँकेच्या व्यवस्थापकपदी नियुक्ती झाली आहे.

लेवा बारभाई तांडा येथील रहिवासी असलेल्या प्रतीक्षा जाधव यांनी प्रचंड मेहनत, अभ्यासू वृत्ती आणि ठाम ध्येय साध्य करण्याच्या जिद्दीने ही महत्वपूर्ण जबाबदारी प्राप्त केली आहे. त्यांच्या या यशामुळे त्यांनी बँक व्यवस्थापक पदापर्यंतचा प्रवास सुस्पष्टपणे पार केला असून, इतर विद्यार्थ्यांसाठी ती एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. प्रतीक्षा जाधव यांची नियुक्ती समाजाच्या विविध क्षेत्रात स्वागतार्ह ठरली असून, त्यांच्या प्रावीण्याबद्दल आणि कर्तृत्वाबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या यशाने, विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत, चिकाटी आणि ध्येयनिष्ठा ठेवून कोणतीही उंची गाठू शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# रेमंड कामगारांचा प्रश्न विधानसभेत गाजला

## आ. बाळासाहेब मांगुळकर यांनी वेधले शासनाचे लक्ष

प्रतिनिधी १ मार्च



**यवतमाळ** : यवतमाळ जिल्ह्यातील हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या रेमंड युको डेनिम प्रा. लि. कंपनीतील कामगारांचे प्रलंबित प्रश्न आज राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उभे राहिले. आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी सभागृहात हा प्रश्न अत्यंत ठामपणे मांडत, शासनाने तातडीने मध्यस्थी करून कामगारांना न्याय मिळवून देण्याची मागणी केली. सभागृहात बोलताना आमदार मांगुळकर यांनी स्पष्ट केले की, रेमंड कंपनी ही फक्त उद्योग नाही, तर यवतमाळच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे. सध्या या कंपनीतील कामगार आपल्या हक्कांसाठी उपोषण करत आहेत. प्रशासन आणि व्यवस्थापनात होणाऱ्या विलंबामुळे हजारो कुटुंबांच्या चुली विझण्याची भीती निर्माण झाली आहे.

यवतमाळ जिल्हा शेतकरी आत्महत्यांमुळे आणि आर्थिक संकटामुळे आधीच संवेदनशील आहे. अशा परिस्थितीत जर हा मुख्य उद्योग डळमळीत झाला, तर सामाजिक आणि आर्थिक स्थितीवर गंभीर परिणाम होतील. गेल्या २२ महिन्यांपासून ठप्प असलेला वेतन वाढीचा करार आणि इतर मागण्यांकडे व्यवस्थापनाने दुर्लक्ष केल्याने कामगारांमध्ये असंतोष वाढले आहे. आमदार मांगुळकर म्हणाले, "घोषणा नव्हे, कृती हवी! कामगार रस्त्यावर बसले आहेत आणि व्यवस्थापन चर्चेची केवळ औपचारिकता करत आहे. या परिस्थितीत मंत्र्यांनी स्वतः हस्तक्षेप करावा आणि व्यवस्थापनाला कामगारांच्या हिताचा निर्णय घेण्यास भाग पाडावे." गेल्या अनेक दिवसांपासून आझाद मैदानात उपोषण करणाऱ्या कामगारांच्या लढ्याला आता विधानसभेत व्यासपीठ मिळाले आहे. यामुळे संपूर्ण जिल्हा शासनाच्या पुढील पावल्या आणि निर्णयाकडे लक्ष देत आहे, आणि कामगारांमध्ये आशेचे किरण दिसू लागले आहे.

# परिस्थिती कशी असली तरी आपली गुणवत्ता सिद्ध करावी - प्रा.डॉ.पुनीत मातकर

प्रतिनिधी १ मार्च



**यवतमाळ** : परिस्थिती कशी असली तरी आपण आपली गुणवत्ता सिद्ध करावी लोक आपल्या गुणांची दखल घेतात . विद्यार्थ्यांनी प्रत्येक स्पर्धेत सहभागी व्हावं म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. कुठलाही विद्यार्थी आपल्या जीवनात ज्ञान आणि कौशल्य प्राप्त करू शकतो असे प्रतिपादन आम्ही असे घडलो या संस्कारमालेतून सुपरिचित कवी, वक्ता, लेखक नाट्य लेखक, साहित्यिक,शिक्षणतज्ञ व डाएट प्रा डॉ. पुनित मातकर यांनी विद्यार्थ्यांना व्यक्त केले .

सत चिकित्सा प्रसारक मंडळ यवतमाळ द्वारा संचालित डॉ. नंदुरकर विद्यालयमध्ये विविध क्षेत्रातील यशस्वी व्यक्तिमत्त्वाच्या जीवनातील प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडण्यासाठी आम्ही असे घडलो या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांद्वारा या यशस्वी मान्यवरांची प्रगट मुलाखत घेतली जाते. याप्रसंगी प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. पुनित मातकर , मुख्याध्यापिका ज्योती बाविस्कर, शीतल तिखिले आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांचे हस्ते भगवान श्री सत्यसाईबाबांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थिनी सामूहिकपणे श्री गणपती अथर्वशीर्षचे पठण केले. त्यानंतर प्रमुख अतिथीं प्रा पुनित मातकर यांचा शाल व पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रा पुनित मातकर यांची प्रगत मुलाखत घेतली. पुनित सरांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. आपल्या जीवन प्रवासातील सुखदुःखाचे प्रसंग विद्यार्थ्यांसमोर दिलखुलासपणे मांडले. लोकांनी आपल्याला मेहनती आणि चरित्रवान व्यक्तिमत्व म्हटलं पाहिजे. आपल्या आयुष्यात सर्वात मोठी भूमिका आई-वडिलांचे असते म्हणून आई-वडिलांना कधीही दुखवू नये. सदैव गुरूचा सन्मान करावा. कलाही तुम्हाला जगण्याची प्रेरणा देते बळ देते त्यामुळे आपल्या अंगी कला बानवावी असे प्रतिपादन व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना डॉ. पुनीत मातकर यांनी बालपणीचे अनुभव सांगितले. यशस्वी व्यक्तिमत्व घडविण्यासाठी कोणते गुण अंगिकारावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन व आभार प्रदर्शन जयंत चावरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका ज्योती बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली समस्त शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि. १ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## प्रवाशांची एकजूट, बांधणार वज्रमूठ

# मग्रूर ठेकेदाराला दादागिरीचा छंद...
# रेल्वे स्टेशनवरील पार्कींग करा बंद !

## दादागिरीचा तिढा, ठेका रद्द करण्यासाठी उभारणार लढा

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम रेल्वे स्टेशनवर काहीच कारण नसतांना सिसीटीव्ही कॅमेरे असतांना पार्कींगचे पैसे देवूनही पार्किंगमध्ये ठेकेदाराची दादागिरी दररोज वाढत आहे. या ठेकेदारासोबत रेल्वे अधिकाऱ्यांची भागिदारी असल्यामुळे आपले कोणची काही करू शकत नसल्याने तो मग्रूर ठेकेदार प्रवाशाना अश्लिल भाषेत महिलांसमोरच शिवीगाळ करून मारहाणीची भाषा करतो, या सर्व प्रकाराला वाशीम शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. त्याच्या आरेरावीचा व दादागिरीचा पोलिसांना शिवीगाळ केल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला होता. या सर्व प्रकाराची सर्वप्रथम सिटी न्युज सुपरफास्टने व आरआरसी सिटी न्युज चॅनलने वृत्त लावून धरून पाठपुरावा केला. त्यामुळे पोलिसांनीच या मग्रूर ठेकेदाराविरूध्द गुन्हा दाखल केला असून हा ठेकेदार फरार आहे. तर या दादागिरी करणाऱ्या ठेकेदाराचा ठेका रद्द करा अशी मागणीच






रेल्वे समितीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी व सुरज चौधरी यांनी रेल्वे अधिकाऱ्यांकडे केली आहे. आता त्रस्त प्रवाशी एकजुठ होत असून दादागिरीच्या विरोधात वज्रमुठ बांधली आहे. ठेका रद्द करण्यासाठी त्रस्त झालेले प्रवाशी नागरिकच लढा उभारणार आहेत.

माणुसकी नावाचा काही प्रकार असतो. चांगल्या बोलण्याने वागल्याने माणुस पैशाकडेही पाहत नाही रेल्वे स्टेशनच्या परिसरात गाडी आल्यापासुन मोठ्या आवाजात दादागिरीने बोलुन लोखंडी रॉड घेऊन मारण्याच्याच हेतुने ठेकेदार उभा असतो प्रेमाने काहीच बोलत नाही. घाण घाण शिवीगाळ करत गाडी पार्कींग करा. नाहीतर मारहाण करण्याच्या थेट धमक्या देतो. प्रवाशा सोबत बहुतांशी महिला व मुलीअसतात त्यांनाही न जुमानता मागील पुढील विचार न करता थेट अश्लिल शिवीगाळ करुन मारण्याच्या धमक्या देतो.अनेकांना रॉडने मारहानी केल्याच्या सुध्दा तक्रारी आहेत.

प्रेमाने प्रवाशी भिकाऱ्याला व तृतीय पंथ्याला १० रुपयाऐवजी २० रुपये देतात. मात्र हा मगरुर ठेकेदार ६ रुपयाच्या पार्कींगसाठी प्रवाशांवर दादागिरी करतो. त्याला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची साथ असल्याची चर्चा आहे. वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस येत आहेत. पार्कींग मधील बाईक घेण्यासाठी आलेल्या युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून या पार्कींग ठेकेदारावर गुन्हा दाखल झाला असून आता ठेका रद्द करावा अशी मागणी सर्व सत्तरातुन होत आहे.

वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला होत.पार्कींगची पावती नसल्याने बाईक घेण्यासाठी आलेल्या युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झालं होतं.त्यानंतर या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात होतं.तसेच या मुजोर पार्कींग बंद करून ठेकेदारावर कठोर कारवाईची मागणी सर्व स्तरातून केली जात होती.


शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...
दादागिरीची ठेकेदारी, अधिकाऱ्यांची भागिदारी !
सिटी न्यूज सुपरफास्ट शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६
माणुसकीला रोजच हरताळ...
रेल्वे पार्कींग वाल्याची पोलीसांनाही शिवीगाळ!
अरेरावीची ठेकेदारी, म्हने कायद्यापेक्षाही भारी
वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...
दादागिरी रोजच पुन्हा-पुन्हा, पोलिसांनीच दाखल केला गुन्हा !
काहीच कारण नसतांना, सिसीटीव्ही कॅमेरे असतांना, पार्कींगचे पैसे देवूनही त्रास विनाकारण
वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...
दादागिरीची हद्द, ठेका करा रद्द !
रेल्वे समितीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी व सुरज चौधरी यांनी केली खुद्द
वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्या...
ठेकेदाराची लूट, अधिकाऱ्यांची सूट !
दादागिरीचा तिढा, ठेका रद्द करण्यासाठी उभारणार लढा
गुरूवार दि. १९ जानेवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगमध्ये...
लूटण्याची सुविधा, मॅनेज निविदा !
दादागिरीची ठेकेदारी, अधिकाऱ्यांची भागिदारी...
सिटी न्यूज वाशीम सामाजिक संघटना एकत्र...
वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगमध्ये...
बदला दादागिरीच्या ठेकेदारीचे सत्र !
काहीच कारण नसतांना, सिसीटीव्ही कॅमेरे असतांना, पार्कींगचे पैसे देवूनही त्रास विनाकारण
सिटी न्यूज वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगचा ठेका...
रद्द न करण्याचा करार !
दादागिरीची तक्रार, मग्रूर ठेकेदार फरार

## थोडक्यात

### भाजपा जिल्हाध्यक्ष चितलांगे यांची कालापाड कुटुंबाला मदत



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

मालेगांव तालुक्यातील पांगरीनवघरे येथे राजू हरिभाऊ कालापाड या शेतकऱ्याच्या मुलीच्या लग्नाची सोय नसल्यामुळे शेतकऱ्यानी कर्जपणाला कंटाळून आत्महत्या केल्यामुळे आज या ठिकाणी भाजपा वाशिम जिल्हाध्यक्ष मा पुरुषोत्तम चितलांगे यांनी या कुटुंबाला सात्वनपर भेट दिली व त्या मुलीला नवीन गॅस कनेक्शन व आर्थिक स्वरूपात मदत केली यावेळी गावातील गावकरी मंडळी व सोबत भाजपा जिल्हा सचिव मा श्री गजानन नवघरे पाटील मा श्री विलास पाटील नवघरे मा श्री सुभाष पाटील नवघरे व सरचिटणीस भाजपा युवा मोर्चा वाशिम मा राजु सांगळे व भाजपा कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

### छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने वाशिम तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा क्र. १)' राबविण्यात येत आहे. मार्च ते मे २०२६ या कालावधीत मंडळ स्तरावर विविध ठिकाणी समाधान शिबिरे आयोजित करण्यात येणार असून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूल विषयक दैनंदिन प्रश्नांचे तात्काळ निवारण करण्यात येणार आहे.

या अभियानाच्या अनुषंगाने दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली देवकर यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी बैठक पार पडली. बैठकीस सर्व कार्यालय प्रमुख, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, सरपंच व पोलिस पाटील उपस्थित होते.

## मंगरूळपीर नगरपरिषदेला घनकचरा भेट...
# उपनगराध्यक्षांचा प्रशासनावर हल्लाबोल थेट !

### अनिल गावंडे यांचा गांधीगिरी आंदोलनातून निषेध

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर नगरपरिषद येथे स्वच्छतेच्या प्रश्नावरून प्रचंड संताप उसळला असून प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात उपनगराध्यक्ष तथा आरोग्य सभापती अनिल विठ्ठलराव गावंडे यांनी थेट गांधीगिरी आंदोलनाचा मार्ग अवलंबला. नगरपरिषद आवारातच घनकचरा आणून त्यांनी जाहीर निषेध नोंदवत प्रशासनाला आरसा दाखवला.उपनगराध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारून तब्बल एक महिना उलटूनही स्वतंत्र कार्यालयाची व्यवस्था न झाल्याने जनतेची कामे रखडली असल्याचा आरोप गावंडे यांनी केला. कार्यालयच नसेल तर कामे कशी करायची, असा सवाल उपस्थित करत त्यांनी शहरातील स्वच्छतेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचा आरोप केला.





शहरातील अनेक प्रभागांमध्ये नाल्यांची साफसफाई ठप्प असून मुख्य रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचले आहेत.घंटागाड्यांची संख्या अपुरी असल्यामुळे काही भागांत पाच ते सात दिवसांनीच कचरा उचलला जात असून दुर्गंधी, डास आणि रोगराईचा धोका वाढला आहे. मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू असतानाही स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाची उदासीनता उघड झाली आहे, असा घणाघात गावंडे यांनी केला.संपूर्ण शहरासाठी आवश्यक असलेल्या घंटागाड्यांपैकी केवळ एक ते तीनच कार्यरत असून उर्वरित वाहनांची दुरवस्था आणि बिघाडामुळे कचरा संकलन व्यवस्था कोलमडली आहे. प्रत्येक वार्डासाठी घंटागाडी आवश्यक असताना स्वच्छतेसाठी आलेला निधी नेमका कुठे खर्च झाला, असा थेट सवालही त्यांनी उपस्थित केला.परिस्थितीच्या निषेधार्थ उपनगराध्यक्षांनी स्वतःच्या खुर्चीवरच शहरातील घनकचरा ठेवून प्रतीकात्मक आंदोलन केले. नगरपरिषद आवारात हा प्रकार घडताच नागरिकांमध्ये मोठी चर्चा रंगली. शहर स्वच्छ ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचे हे जिवंत उदाहरण असल्याचा आरोप त्यांनी केला. 'तात्काळ नवीन घंटागाड्या खरेदी करून शहरातील साफसफाई सुरळीत करा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल,' असा स्पष्ट इशारा देत अनिल गावंडे यांनी मुख्याधिकाऱ्यांना धारेवर धरले. या प्रकरणाची प्रतिलिपी जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम तसेच नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना पाठविण्यात आली आहे. मंगरूळपीर शहरात स्वच्छतेच्या प्रश्नावरून उफाळलेल्या या संतापामुळे प्रशासनाची झोप उडाली असून आता ठोस कारवाई होते की केवळ आश्वासनांवरच विषय थंडावतो, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## रस्त्यावरील अतिक्रमण काढून रस्ता मोकळा करून देण्याची मागणी

### पठाणपुरा वासियांचे मुख्याधिकारी यांना निवेदन

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

शहरातील पठाणपुरा (वार्ड नं. ११) येथील गल्लीतील अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा करून देण्यात यावा अशी मागणी पठाणपुरा येथील रहिवासी सोहील खान असलम खान व अन्य नागरिकांनी दिनांक २७ फेब्रुवारी रोजी मुख्याधिकारी सतीश शेवदा यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.



प्रभागातील पठाणपुरा मशिदीपासून ते सवारीचा धाबा या दरम्यान असलेल्या गल्लीत ठिकठिकाणी नागरिकांनी अवैध अतिक्रमणे केली आहेत.या अतिक्रमणामुळे रस्ता अत्यंत अरुंद झाला असून, आम्हाला दैनंदिन येण्या-जाण्यासाठी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.रस्ता अरुंद असल्यामुळे प्रभागात रुग्णवाहिका किंवा ऑटो येऊ शकत नाही, परिणामी आजारी रुग्णांना तातडीने दवाखान्यात नेणे कठीण झाले आहे.गल्लीत नगर परिषदेची घंटागाडी किंवा हातगाडी येत नसल्याने कचरा व्यवस्थापनाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. तर आम्हाला लोकशाही मार्गाने 'आमरण उपोषण' करावे लागेल असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे निवेदन देताना पठाणपुरा येथे नागरिक उपस्थित होते.

## केकतउमरा येथे शिवचरित्रावर ओजस्वी व भावस्पर्शी व्याख्यान

### डॉ. शे.दे. पसारकर संवाद व्यासपीठाच्या व्याख्यानमालेचा प्रेरणादायी शुभारंभ

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

येथील ग्रामपंचायत परिसरातील सभागृहामध्ये डॉ. शे.दे. पसारकर संवाद व्यासपीठ आयोजित व्याख्यानमालेचा शुभारंभ बीड येथील शिक्षक, लेखक व शिवव्याख्याते गणेश भोसले यांच्या प्रभावी शिवव्याख्यानाने झाला. त्यांच्या जिवंत आणि भावपूर्ण मांडणीमुळे उपस्थित श्रोत्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र केवळ ऐकले नाही, तर अनुभवले.

व्याख्यानाच्या प्रारंभी त्यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगितला. ज्ञानाच्या बळावर व्यक्तिमत्त्व कसे घडते, याची जाणीव करून देत त्यांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर देशाभिमानाचा संदर्भ देताना यशवंतराव चव्हाण यांच्या बालपणीचा भावनिक प्रसंग उभा करून राष्ट्रप्रेमाची जाणीव उपस्थितांच्या मनात जागवली.




यानंतर त्यांनी शिवचरित्राचा प्रवास सुरू केला आणि हिरोजी इंदुलकरांची महाराजांप्रती असलेली निष्ठा, अफजलखानाचा वध, तसेच 'आधी लगीन कोंढाण्याचं' अशी तानाजी मालुसरे यांनी घेतलेली शपथ अशा अनेक प्रसंगांची अत्यंत प्रभावी व भावनिक मांडणी केली. या प्रसंगांचे वर्णन करताना त्यांनी प्रेक्षकांना त्या काळात घेऊन जात शिवाजी महाराजांवरील जनतेची अढळ श्रद्धा आणि त्यांच्या पराक्रमाचा गौरव जिवंतपणे अनुभवायला लावला. अफजलखान वधाचा प्रसंग सांगताना सभागृहात रोमांचकारी वातावरण निर्माण झाले, तर हिरोजी इंदुलकरांच्या निष्ठेचा उल्लेख करताना श्रोते भावूक झाले. स्त्री सन्मान जपणारा आणि न्यायप्रिय राजा म्हणून शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व किती महान होते, याचा प्रभावी संदेश त्यांनी दिला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशिम येथील डॉ. विजय जाधव उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, संत गाडगेमहाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा संदर्भ देत त्यांच्या विचारांचे समाजाला असलेले महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य हर्षा पसारकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन वामन घोडे यांनी केले.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त...
# तोंडगाव येथे भाषण स्पर्धेचे आयोजन !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

**वाशिम येथून जवळच असलेल्या तोंडगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती, मराठी भाषा दिन आणि संत गाडगेबाबा यांच्या जयंतीचे औचित्य साधून शुक्रवार, २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी विद्यार्थ्यांसाठी भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.**




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भगवानराव गोटे (माजी जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, वाशिम तर उद्घाटक म्हणून वाशीम बाजार समितीचे संचालक दत्तात्रय गोटे हे होते. या भाषण स्पर्धेत विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक आणि माध्यमिक असे दोन गट होते. या स्पर्धेसाठी अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त होती.सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, संत गाडगेबाबा आणि कुसुमाग्रज यांच्या प्रतिमांचे पूजन करून स्पर्धेस प्रारंभ करण्यात आला. दीप प्रज्वलित करून भाषण स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषण करून उपस्थितांचे मन जिंकले. या भाषण स्पर्धेत प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक कुमारी दर्शना गणेश गोटे यांनी पटकावला तर द्वितीय क्रमांक भाग्यश्री काळबांडे आणि तृतीय क्रमांक कुमारी अधिरा काळबांडे या चिमुकलीने पटकावला. माध्यमिक गटातून प्रथम येण्याचा बहुमान कुमारी प्रांजल नारायण गोटे हिने तर द्वितीय क्रमांक कुमारी दिव्या कांबळे हिने पटकावला या स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व ४६ विद्यार्थ्यांचा पेपर पॅड आणि पेन देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत अशोक इढोळे यांनी केले उद्घाटक दतराव गोटे यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. प्रत्येक विद्यार्थ्याने शालेय जीवनापासूनच थोर पुरुष आणि संतांचे विचार आचरणात आणण्याची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर भगवानराव गोटे यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराज, संत गाडगेबाबा, आणि कुसुमाग्रज अंधश्रद्धा निर्मूलन कीर्तन याबाबत मोलाचे मार्गदर्शन करून प्रत्येक विद्यार्थ्यांनी थोर पुरुषांचे विचार आत्मसात करण्याचे आवाहन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी सुद्धा आपले विचार व्यक्त भाषण स्पर्धेच्या आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले. या कार्यक्रमास दगडू पाटील, दाजीबा पाटील, रामहरी मल्हारी गोटे, दिगंबर शिंदे, डॉक्टर सुरेश निवृत्ती गोटे, बँक मॅनेजर नारायणराव गोटे, समाजसेवक अश्रुजी गोटे, नामदेवराव काळे, शाळा समिती अध्यक्ष गणेश शांताराम गोटे, जनक्रांतीचे अध्यक्ष राजू कोंघे, गोपाल दत्ता गोटे, गणेश तुकाराम गोटे, उत्तम काळे, प्रकाश गोटे भवानी, गोपाल गर्दने, गणेश रामदास गोटे मानदार, संदीप इढोळे यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती भाषण स्पर्धेचे परीक्षक म्हणून मुख्याध्यापक सुभाष निंबाजी गोटे, आदर्श शिक्षक संतोष इढोळे, संतोष भारती, शंकर भारती, गोपाल जगन्नाथ काळे यांनी काम पाहिले. आभार गजानन पाटोळे यांनी मानले या कार्यक्रमास गावातील नागरिकांची बहुसंख्य उपस्थिती होती.

## हरितसेनेच्या वतीने नैसर्गिक रंग निर्मितीबाबत जनजागृती

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

एस एम सी इंग्लिश स्कूल वाशीमच्या राष्ट्रीय हरित सेना व निसर्ग ईकोक्लब व सामाजिक वनीकरण विभाग वाशीमच्या वतीने पर्यावरण पूरक होळी साजरी करण्याचे आवाहन प्राचार्य मीना उबगडे, सामाजिक वनिकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी अशोक प-हाड व राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी , पर्यवेक्षीका प्रणीता हरसुले वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र कातखेडे आणि हरितसेनेच्या चिमुकल्यांनी केले .



दरवर्षी आपल्या राज्यात होळीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. याशिवाय धूळवाडीच्या वेळेस वापरण्यात येणारे रासायनिक रंग माणसांसाठी तसेच पर्यावरणासाठी अतीशय घातक असतात. अपप्रवृत्तीचा नाश व्हावा या उद्देशाने होळी हा सण साजरा करण्यात येतो .परंतु हा उद्देश मागे पडत चाललेला असून हि होळी पर्यावरणात्मक साजरी करण्यासाठी 'खेलो होली इको फ्रेंडली ' या संकल्पनेचा पुरस्कार करणे आवश्यक आहे.

या कार्यशाळेला सामाजिक वनीकरण विभागाचे वनपाल रेणुका केंद्रे, मंगलप्रसाद बेले, वनरक्षक संतोष जुमडे भगवान वानखेडे, अनिल लेमले तसेच हरित सेनेचे चिमुकले यांनी मोलाचे सहकार्य केले.कार्यक्रमाचे आयोजन व नैसर्गिक रंग निर्मितीचे प्रात्यक्षिक राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

रविवार, दि. १ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अमेरिका, इस्त्रायल इराण युद्धामुळे भडकणार इंधनाचे दर ?

प्रतिनिधी १ मार्च

**अकोला :** अमेरिका इसराइल व इराण या देशाचे युद्ध भडकले असून इराणचे सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खामेंनेई यांचा क्षेपणास्त्र हल्ल्यात मृत्यू झाला त्यामुळे संपूर्ण इराणमध्ये अमेरिका आणि इस्त्राईल विरोधात जबरदस्त रोष दिसून येत आहे. लाखो लोक रस्त्यावर उतरून अमेरिका व इस्त्रायल ला धडा शिकवण्याची मागणी करीत आहेत. इराण ने सुद्धा यापेक्षाही भयानक हल्ल्याला तोंड देण्यासाठी तयार राहण्याची



चेतावणी अमेरिका आणि इस्त्राईलला दिली आहे त्यामुळे हे युद्ध एवढ्यात थांबण्याचे लक्षण दिसून येत नाही युद्धामुळे इंधन दरवाढीबाबत सध्यातरी साशंकता आहे मात्र दरवाढ झाल्यास सर्वच वस्तूंचे दर वाढण्याची भीती आहे दळणवळणात महत्त्वाचा घटक असलेल्या पेट्रोल व डिझेलचेही साठे इराण मध्ये आहेत. या युद्धामुळे पेट्रोलियम कंपन्यांकडून सध्यातरी इंधन दरवाढीचे संकेत नाही दोन दिवसात याविषयी अधिक स्पष्ट होऊ शकते या युद्धात इराणमधील इंधन साठ्यांचे नुकसान झाल्यास इंधनाच्या आवक वर परिणाम होऊन भाव वाढ होऊ शकते अशी शक्यता वर्तवली जात आहे. मात्र यात झालेल्या भाव वाढीचा बोजा सरकारने सहन केला तर ग्राहकांना भाव वाढीपासून दिलासा मिळू शकतो.

### परिस्थिती अधिक चिघळल्यास आवक ठप्प

◆अमेरिका व इराण यांच्यातील युद्ध काही दिवसात थांबले नाही व परिस्थिती अधिक चिघळली तर इराण मधून येणाऱ्या सर्व वस्तूंची आवक ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे त्यामध्ये सुक्यामेवाचा सुद्धा समावेश आहे रमजान महिन्यात खजूर अंजीर सह इतरही प्रकारच्या सुक्या मेव्याला मागणी वाढली असताना किरण मधून येणाऱ्या या वस्तूंच्या आवक वर मोठा परिणाम होण्याचे संकेत दिले जात आहे त्यामुळे युद्ध आणखी काही काळ वाढल्यास पेट्रोल व डिझेल सह सुक्या मेव्याच्या दरात देखील काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे

# डाबकी रोड रस्त्याचे काम कधी पूर्ण होणार!

◆ रोजच्या डोकेदुखीला नागरिक कंटाळले



प्रतिनिधी १ मार्च

**अकोला :** शहरातील विकास कामांची कासवगती स्थानिक रहिवाशांसाठी अग्निपरीक्षा ठरत आहे. डाबकी रोडवर गजानन महाराज मंदिर ते श्रीराम टॉवर पर्यंत रस्त्याचे झाले आहे. रस्त्याच्या एका बाजूला खोदून ठेवले आहे. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांची प्रचंड गैरसोय होत आहे. हे काम कधी पूर्ण होणार हा प्रश्न पडला आहे.

या मार्गावर रहदारी मोठ्या प्रमाणात आहे. चार चाकी वाहने, ऑटोरिक्षा, दुचाकी वाहने रात्रंदिवस धावत असतात. रस्ता विस्तारीकरण काम हाती घेतले. मात्र काम रखडले. कंत्राटदाराला यासाठी जबाबदार धरले. इतकेच नाही तर या वरून राजकारण देखील झाले. परंतु रस्त्याचे काम अद्याप मार्गी लागले नाही. नागरिकांना होणारा त्रास तातडीने दूर व्हावा म्हणून रखडलेले काम त्वरित पूर्ण करावे अशी मागणी जोरकसपणे केली जात आहे.

### कामात दिरंगाई, शहराचे वैशिष्ट्य

◆अकोला शहरात विकास कामे उत्साहाने सुरू होतात. मात्र कामे वारंवार रखडतात. शहरवासीयांना त्याचा त्रास होतो. परंतु ओरड होऊनही काहीही परिणाम होत नाही. असा प्रकार विविध विकास कामांबाबत दिसून येतो. यामध्ये सुसुत्रता हवी.

# शेगाव आगाराची बस लक्झरी पुलावर बंद पडली

◆ वाहनांची रांग लागली एक रुग्णवाहिका वाट काढत निघाली

प्रतिनिधी १ मार्च




**अकोला :** लक्झरी बसस्थानक नजीकच्या पुलावर शेगाव बस आज दुपारी अचानक बंद पडली. त्यामुळे मार्गावरील वाहतूक जवळपास अर्धा तास खोळंबली. एका रुग्णवाहिकेला कशीबशी वाट काढावी लागली. शेगाव येथून अकोल्याला बस येत होती. आणि अचानक बंद पडली.

एसटी महामंडळाच्या बसेस केव्हा आणि कुठे बंद पडतील याचा नेम नाही. शेगाव अकोला बस रस्त्यात बंद पडल्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. बस वा-यावर सोडून वाहन चालक डेपो मध्ये गेले. तोपर्यंत प्रवासी ताटकळत बसले होते. अकोला शहर आणि परिसरात एखादी तरी बस रोज बंद पडते. यामध्ये सुधारणा होण्यासाठी एसटी विभाग लक्ष देईल का अशी विचारणा प्रवाशांकडून केली जात आहे.

# आमदार साजीदखान पठाण यांच्या पुढाकाराने त्या कुटुंबाला साडेचार लाखाची मदत

प्रतिनिधी १ मार्च

**अकोला :** २९/०८/२०२५ रोजी येथे झालेला वादळी पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे सोनटक्के प्लॉट मध्ये सैय्यद समीर उर्फ राजा ३२, रा. सोनटक्के हे कामावरून घरी जात असताना त्यांच्या अंगावर वीजेची तार तुटून पडली. त्यांना जोरदार विद्युत धक्का बसल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. कुटुंबाचा आधार गेल्याने संकट ओढवले. आमदार साजिद खान पठाण यांनी महावितरणकडे पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे सैय्यद समीर यांच्या



कुटुंबियांना चार लाख रुपयांची नुकसान भरपाई सुपूर्द करण्यात आली.

आमदार साजिद पठाण यांनी मृतकाच्या कुटुंबियांना आश्वासन दिले की, त्यांच्या कुटुंबाच्या अडचणीच्या वेळी ते खंबीरपणे उभे राहतील. या प्रसंगी महावितरण विभागाचे कार्यकारी अभियंता हेमंत पावडे, कार्यकारी अभियंता अजित दिनोरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुशीलकुमार जयस्वाल, याकूब पहेलवान, अकोला पश्चिम विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष मो. शारीक, इरफान कास्मानी, सैय्यद अहमद आदी उपस्थित होते.

# शहरात पाण्याचा अपव्यय चिंताजनक

◆ पाणी पुरवठ्याच्या दिवशी रस्त्यावर पाण्याचे लोट



प्रतिनिधी १ मार्च


**अकोला :** शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी वेगवेगळ्या भागात जलकुंभांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यावरून वेगवेगळ्या भागांना ठराविक दिवशी पाणी पुरवठा करण्यात येतो. ज्या दिवशी नळ येतात त्या दिवशी त्या भागात रस्त्यावरून पाण्याचे लोट वाहताना दिसतात. अनेक जण याच पाण्याने वाहने धुतात, काही पाळीव कुत्र्यांना आंघोळी घालतात. तर अनेक जण सर्व्हिस लाइनमध्ये पाण्याचा पाइप सोडून देतात. विविध कारणांमुळे होणारी नासाडी थांबणे गरजेचे आहे. आता तापायला सुरूवात झाली आहे. त्यामुळे खरेतर पाणी जपून वापरणे आवश्यक आहे. परंतु विविध कारणांमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होताना दिसून येत आहे. याकडे लक्ष देऊन पाण्याची नासाडी करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. जिल्हा प्रशासनाने टंचाई आराखडा तयार केला आहे. उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवणार नाही यादृष्टीने उपाय योजना राबविण्यात येत आहेत. परंतु महत्त्वाचा मुद्दा आहे उपलब्ध पाण्याचा योग्य प्रकारे वापर करणे.

# लक्झरी बसस्थानक ते मानव शोरूम अतिक्रमण वाढले

### मोकळी जागा दिसली की दुकानदारी सुरू

प्रतिनिधी १ मार्च

**अकोला :** शहरात एका भागातील अतिक्रमण काढले की पुन्हा नव्याने अतिक्रमण केले जाते. असाच प्रकार सध्या लक्झरी बसस्थानक ते मानव शोरूम पर्यंत दिसून येतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूला अस्थाई विक्रेत्यांनी दुकानदारी सुरू केली आहे. महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाने याकडे देखील लक्ष द्यावे अशी मागणी आहे.



वाढते अतिक्रमण ही शहरासाठी समस्या झाली आहे. महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाला कायम सक्रिय राहावे लागते तरीही फायदा होत नाही. अस्थायी विक्रेते मोकळी जागा दिसली की व्यवसाय सुरू करून देतात. त्यांना कसलाही धरबंद राहिला नाही. जुने अतिक्रमण हटवताना नव्याने निर्माण होणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्याशिवाय ही समस्या दूर होणार नाही असे त्या भागातील रहिवाशांचे म्हणणे आहे.

# श्री श्याम बाबांच्या चरणी ११ किलो केक अर्पण

प्रतिनिधी १ मार्च

**अकोला :** शहराजवळील गीता परिसरातील श्री रामदेव बाबा व श्री श्याम बाबा मंदिरात फाल्गुन शुक्ल पक्षातील द्वादशीच्या पावन मुहूर्तावर श्री श्याम बाबांच्या चरणी बछेर परिवाराच्या वतीने ११ किलो वजनाचा आकर्षक केक अर्पण करण्यात आला. यावेळी मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

राजस्थान राज्यातील खाटू येथे विराजमान असलेल्या श्री खाटू श्याम बाबा यांचा फाल्गुन उत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. 'हारे का सहारा, श्याम हमारा' या श्रद्धाभावातून देशभरातील श्याम



भक्तांकडून प्रभूची भक्तीभावाने आराधना केली जाते. विगत अनेक वर्षांपासून श्री श्याम प्रभूंवर अटळ श्रद्धा ठेवून सेवा करणाऱ्या बछेर परिवाराने विविध धार्मिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. श्याम भक्तीच्या बळावर त्यांनी अनेक चांगल्या अनुभूती घेतल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. केक अर्पणानंतर आरती व प्रसाद वितरणाचा कार्यक्रम पार पडला.

# महावितरण यंत्रणा वसुलीत मग्न, सुविधांचा पडला विसर

### शहरातील विविध भागात उघड्या डीपी घातक

प्रतिनिधी १ मार्च

**अकोला :** नागरिक विजेचा वापर करतात. त्यामुळे वीज बिल त्यांनी भरलेच पाहिजे परंतु मार्च एंड च्या नावाखाली महावितरण कडून लहान सहान रकमेसाठी जो आग्रह धरला आहे तो अतिरेकी वाटतो. ग्राहक त्या बाबतीत नाराजी व्यक्त करीत आहेत. मात्र, त्याचवेळी शहराच्या विविध भागातील उघड्या डीपी मोठी समस्या झाली आहे. त्याकडे लक्ष पुरवावे अशी अपेक्षा आहे.

शहरातील पोलिस मुख्यालय जवळ रस्त्याच्या बाजूला डीपी उघडी असल्यामुळे या ठिकाणी शॉर्टसर्किट झाल्यास रस्त्याने येणारा



जाणाऱ्या नागरिकांना व लहान मुलांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. इतकेच नाही तर विविध भागात देखील उघड्या डीपी दिसतात. उघड्या डीपींना महावितरणने दरवाजा लावणे आवश्यक आहे. परंतु सातत्याने दुर्लक्ष होते. महावितरण यंत्रणेने याकडे लक्ष पुरवावे अशी नागरिकांची मागणी आहे.

# गुणवंत शिक्षकांचा गौरव, नयना गोटे ठरल्या आदर्श शिक्षिका

पी.एम.श्री. सेमी इंग्रजी प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न
शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष राजेश गावंडे यांचे उत्कृष्ट आयोजन

प्रतिनिधी १ मार्च

**अकोला :** पी.एम.श्री. सेमी इंग्रजी मुलांची वरिष्ठ प्राथमिक शाळा क्र. ७, रामदास पेठ, अकोला यांच्या वतीने आयोजित 'वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा २०२६' नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. या स्नेहसंमेलनाचे यशस्वी आयोजन आणि नियोजनात शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष राजेश गावंडे यांनी संयोजक व आयोजक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. या कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी 'आदर्श शिक्षिका पुरस्कारा'ने नयना गोटे यांना सन्मानित करण्यात आले.



पी.एम.श्री. सेमी इंग्रजी मुलांची वरिष्ठ प्राथमिक शाळा क्र. ७, रामदास पेठ, अकोला यांच्या वतीने आयोजित 'वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा २०२६' नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेहसंमेलनाचे यशस्वी आयोजन आणि नियोजनात शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष राजेश गावंडे यांनी संयोजक व आयोजक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. या कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी शिक्षकांना 'आदर्श शिक्षिका पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रथम आदर्श शिक्षिका पुरस्कार नयना गोटे यांना देऊन गौरविण्यात आले. नयना गोटे यांची उत्कृष्ट सूत्रसंचालन शैली आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी दिलेले मोलाचे योगदान विशेष उल्लेखनीय ठरले. त्यामुळे त्यांचा सन्मान यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच, इतर गुणवंत शिक्षकांमध्ये भावना ईटकीकर (द्वितीय), अनिता नवलकर (तृतीय) आणि मंदा खिरोडकर (चौथा पुरस्कार) यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. प्रमिला ताई ओम हॉल येथे झालेल्या या सोहळ्यास अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. यामध्ये महापौर शारदाताई खेडकर, उपमहापौर



अमोल गोगे, आयुक्त सुनिल लहाने, पोलिस अधिकारी गजानन शेळके, उपायुक्त विजय पारतवार, शिक्षणाधिकारी हरिषचंद्र ईटकर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव महेशजी गणगणे, उदघाटक म्हणून निकिता देशमुख, मराठा महासंघ महानगर अध्यक्ष रश्मीताई पाटेकर यांच्यासह शहरातील अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या स्नेहसंमेलनाचे यशस्वी आयोजन आणि नियोजनात शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष राजेश गावंडे यांनी संयोजक व आयोजक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. शाळा समिती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक वृंद यांच्या अथक प्रयत्नांमुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.

# फाल्गुन उत्सवाचा महाप्रसादाने समारोप

◆ हजारो महिला पुरुष व बालगोपालांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

प्रतिनिधी १ मार्च

**अकोला :** सकल भाविक भक्तांचे दुःख दूर करणारे व 'हारे का सहारा' म्हणून ओळखले जाणारे श्री खाटू श्याम बाबा यांच्या फाल्गुन उत्सवाचा समारोप शनिवारी सायंकाळी महाप्रसाद वितरणाने भक्तिमय वातावरणात पार पडला. 'श्याम बाबा की जय'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. यावेळी हजारो महिला, पुरुष व बालगोपालांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

शहरातील गीता नगर परिसरातील श्री रामदेव बाबा व श्याम बाबा मंदिरात गेल्या चार दिवसांपासून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अकोल्यासह देशातील विविध शहरांतील नामवंत भजन गायकांनी हिंदी व राजस्थानी भजनांची सुरेल मैफल सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. अकोल्याचे दीपेश वर्मा, नागपूरचा बालकलाकार तनिष्क वासरानी, सौ. निधी मंत्री (अकोला) तसेच कोलकात्यातून विशेष उपस्थित प्रिया अग्रवाल यांनी श्यामभक्तांना भक्तिरसात रंगविले. उत्सवादरम्यान स्व. ओमप्रकाश अग्रवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रोहित ओमप्रकाश अग्रवाल (स्वस्तिक इंडस्ट्री) यांच्या वतीने ५६ भोग अर्पण करण्यात आले. सुनील दिनेशचंद्र



तुलशान व मंजू सुनील तुलशान परिवार यांनी मुख्य यजमान म्हणून जबाबदारी पार पाडली. सहयोगी यजमान म्हणून घनश्यामजी पुरोहित, पंकज अग्रवाल (रिसोड), दीपक वोरा, डॉ. मेहूल पटेल आदींनी मंदिर सजावट व बनवारीलालजी बजाज व संध्या आरती मंडळ ने फरहार आदि ने सेवाकार्यात मोलाचे योगदान दिले. उत्सव यशस्वी करण्यासाठी श्री रामदेव बाबा श्याम बाबा मंदिराचे सर्व पदाधिकारी व सेवाधारकांनी तन, मन, धनाने परिश्रम घेतले. भक्तांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे फाल्गुन उत्सव भक्तिभावात आणि उत्साहात संपन्न झाला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK